दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२१८ शुक्रवार,दि.११ एप्रिल २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-218 | Friday, Dt.11 April 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# मी निर्दोष, मला सोडा!

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडची कोर्टात केविलवाणी मागणी; मारहाणीचा व्हिडिओ कोर्टात

प्रतिनिधी । बीड

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज बीडच्या जिल्हा व सत्र न्यायालयात तिसरी सुनावणी झाली. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम हजर राहून न्यायालयाकडे विनंती अर्ज दाखल केला. त्यासाठी निकम हे कालच बीडमध्ये दाखल झाले होते. या सुनावणीनंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी देखील संवाद साधला.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज झालेल्या सुनावणीत मुख्य आरोपी वाल्मीक कराड याने न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. यामध्ये मी निर्दोष असून मला सोडा अशी केविलवाणी मागणी त्याने न्यायालयात केली आहे.



याबरोबरच आरोपींनी काही कागदपत्र देखील न्यायालयाला मागितली होती. त्यानुसार आज सरकारी पक्षाच्या वतीने ती कागदपत्र न्यायालयात दाखल करण्यात आली असल्याची माहिती विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचा व्हिडिओ आरोपींनी काढला होता. तो व्हिडिओ देखील न्यायालयात दाखल करण्यात आला असून तो आरोपींना देण्याआधी सुनावणी करण्याची विनंती आपण न्यायालयाला केली असल्याची माहिती देखील ड. निकम यांनी दिली.

# 'आपले सरकार' पोर्टल

# १४ एप्रिलपर्यंत बंद

प्रतिनिधी । बीड

मुंबई : नागरिकांना पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी सुरू केलेले 'आपले सरकार' पोर्टल १४ एप्रिलपर्यंत बंद राहणार आहे. आधुनिकीकरणाचे काम करायचे असल्यामुळे पोर्टल १४ एप्रिलपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे कोणतेही शासकीय ऑनलाईन काम १४ एप्रिलपर्यंत 'आपले सरकार' पोर्टलद्वारे करता येणार नाही.

शासनाच्या विविध सेवा पारदर्शक पद्धतीने आणि जलदगतीने उपलब्ध व्हाव्यात, कामकाज कार्यक्षम व्हावे, या हेतूने फडणवीस सरकारने 'आपले सरकार' पोर्टल १० वर्षांपूर्वी सुरू केले. या पोर्टलद्वारे जलदगतीने सेवा मिळतात. वेगवेगळी प्रमाणपत्र ऑनलाईन पटकन मिळतात. कार्यालयात जाण्याचा, रांगेत उभे राहण्याचा त्रास वाचतो. वेळ आणि पैसा यांची बचत होते. आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, ओळख पुरावा, नरेगा जॉब कार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र अशी अनेक कागदपत्रे 'आपले सरकार' पोर्टलद्वारे लवकर मिळवता येतात.

शासनाच्या वेगवेगळ्या विभागांशी संबंधित अनेक सेवा 'आपले सरकार' पोर्टलद्वारे उपलब्ध असल्यामुळे सामान्यांचे काम सोपे होते. यामुळे असंख्य नागरिक 'आपले सरकार' पोर्टलचा वापर करतात. मागील काही वर्षात विश्वासार्ह, वेगवान, सुरक्षित आणि पारदर्शक सेवेमुळे 'आपले सरकार' पोर्टल लोकप्रिय झाले आहे.

सध्या राज्यातील ३८ विभागांच्या ४८५ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर आहेत. नागरिकांना या सेवा घरबसल्या मिळवता येत आहेत. सरकारी आकडेवारीनुसार, २०१५ पासून आपले सरकार डिजिटल प्लॅटफॉर्मवर आतापर्यंत एकूण १७ कोटी ६३ लाख ६२ हजार ४६८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातील १६ कोटी ६१ लाख ३ हजार ९०९ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १ कोटी ६६ लाख २३ हजार २७५ अर्ज आले होते.

# कृष्णा आंधळेचा तपास कुठपर्यंत आला? धनंजय देशमुखांची विचारणा

प्रतिनिधी । बीड

संतोष देशमुख हत्या प्रकरणाला १२० दिवस उलटून गेले आहे. पण हत्या प्रकरणातील कृष्णा अंधाळे अजून फरार आहे. त्याचे काय झाले असा सवाल आम्हाला एसपींना विचारायचा आहे, त्यासंदर्भात त्यांची भेट घेणार असल्याचे धनंजय देशमुख यांनी म्हटले आहे.

धनंजय देशमुख म्हणाले की, तपास यंत्रणामधील अधिकाऱ्यांची भेट होत असते. ते सांगतात की पथक कृष्णाचा मागावर आहे, पण तो शातीर असल्याने फोन वापरत नाही. त्यांना तपासात येणाऱ्या अडचणीबद्दल ते माहिती देत असतात.परंतू तो लवकरात लवकर सापडला पाहिजे, त्याला अटक करत शिक्षा झाली पाहिजे. दरम्यान संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा धनंजय देशमुख यांनी पोलिसांना दिलेला जबाबबद्दल काही माहिती समोर आली आहे. यामुळे अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या आहेत.

धनंजय देशमुख म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना क्रूरकर्मी लोकांना लवकरात लवकर फाशीची शिक्षा झाली पाहिजे. एक-दोन दिवसांपूर्वी कृष्णा आंधळे यांच्या विषयी काही माहिती मिळाली का? त्यांनी पत्रकार परिषद घेऊन आंधळेबद्दल माहिती दिली पाहिजे. तो कुठे लपला आहे, त्यांच्या तपासाच्या अपडेट काय आहे, तपास कसा सुरू आहे, याबद्दल माहिती दिली पाहिजे.



## २० वेळा कॉल केले पण त्यांनी ऐकले नाही

धनंजय देशमुखांनी जबाबात म्हटलंय की, मी वाल्मीक कराडला फोन लावला पण फोन व्यस्त आला त्यामुळे मी विष्णू चाटेंना फोन केला, आणि संतोष देशमुख यांना वापस आणून सोडावे अशी विनंती केली. त्यावर चाटेने थोड्याच वेळात भावाला वापस आणून सोडू असे मला म्हटले. मी फोनवरून त्यांनी आपल्या भावाला सोडण्याची २० हून अधिकवेळा विनंती केली होती. मात्र, विनवणी करूनही आरोपींनी ऐकले नाही, १० मिनिट, २० मिनिटात सोडतो असेच म्हणत होते, यानंतर मी सहकाऱ्यांसोबत केज पोलिस ठाण्यात जात तक्रार नोंदवल्याचे त्यांचे जबाबात म्हटल्याचे एका मराठी वृत्तवाहिनीने म्हटले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांचा पगार कपात!

# कर्मचारी संघटनेचा संताप

### एसटी कर्मचाऱ्यांची तक्रार

एस टी कर्मचाऱ्यांच्या काही मागण्या अद्याप प्रलंबित आहेत. त्यात २०१८ पासूनचा महागाई भत्ता थकीत आहे. हायकोर्टाचे भत्ता एकरकमी द्या असे आदेश दिले आहेत, तरी कर्मचाऱ्यांचा ५६ टक्के महागाई भत्ता थकीत आहे. कर्मचाऱ्यांचे पगार ७ तारखेला होत नाहीत. पगाराची कोणतीही निश्चित तारीख नाही. एसटीचं रोज सरासरी २२ कोटी उत्पन्न म्हणजे महिन्याला ६६० ते ७०० कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न आहे. कर्मचाऱ्यांच्या महिन्याच्या पगारासाठी केवळ ४४० कोटी रुपये लागता. मात्र उत्पन्न ७०० कोटी असूनही पूर्ण पगार आणि जो पगार दिला जातो तोही वेळेवर नाही. तालुकास्तरावर घरभाडं ८ टक्के असूनही ७ टक्केच दिले जाते, मात्र तेही वेळेवर दिले जात नाही, अशी तक्रार कर्मचाऱ्यांनी केली आहे.



एसटी कर्मचाऱ्यांचा पगार कपात!

प्रतिनिधी । मुंबई

एसटी कर्मचाऱ्यांचा पगार नेहमीच रखडला जातो. मात्र आता एस टी कर्मचाऱ्यांना निराश करणारा एक निर्णय प्रशासनाने जाहीर केला आहे. कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचा केवळ ५६ टक्के पगार मिळणार आहे. पहिल्यांदाच इतका कमी पगार कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे एसटी कर्मचारी संघटनेकडून संताप व्यक्त करण्यात आला असून आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निधी नसल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचा पगार कमी झाल्याचे समोर आले आहे. मात्र, आधीच अपुरा पगार आणि त्यात जर फक्त ५६ टक्के पगार मिळणार असेल तर एसटी कर्मचाऱ्यांनी जगायचं कसं असा प्रश्न महाराष्ट्र एसटी कर्मचारी सरकारकडे उपस्थित करत आहेत. तसेच सरकारने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली जात आहे. अन्यथा आम्ही कोणत्याही क्षणी आंदोलनाची भूमिका घेऊ असा इशारा एसटी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी दिला आहे.

## एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांची नियुक्ती

प्रतिनिधी । बीड

एसटी महामंडळाची एकीकडे आर्थिक कोंडी सुरु असल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असताना आता एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेल्या नियम व आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांची नियुक्ती एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर केली होती. त्यामुळे राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे फक्त नावापुरतंच परिवहन खातं राहणार अशी चर्चाही जोर धरू लागली होती. नंतर मुख्यमंत्र्यांनी एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाचा निर्णय मागे घेतला होता. आता एसटी महामंडळावर अधिकृतपणे परिवहनमंत्री प्रताप सरनाईकच राहणार असल्याचा शिक्कामोर्तब झालाय.

महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची लोकवाहिनी असलेल्या एसटीला भविष्यात आर्थिक दृष्ट्या सक्षम करून एक चांगली दर्जेदार परिवहन सेवा निर्माण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले आहेत. तसेच आपल्याला या पदावर नियुक्त करून महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे त्यांनी आभार मानले आहेत.


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777



# मनमानी कारभाराचा मुखभंग

विधानसभेने मंजूर केलेली विधेयके अडवून ठेवण्याच्या तमिळनाडूचे अतिउत्साही राज्यपाल आर. एन. रवी यांच्या मनमानी कारभाराला सर्वोच्च न्यायालयाने चपराक लगावली आहे.

विधानसभेने मंजूर केलेली विधेयके अडवून ठेवण्याच्या तमिळनाडूचे अतिउत्साही राज्यपाल आर. एन. रवी यांच्या मनमानी कारभाराला सर्वोच्च न्यायालयाने चपराक लगावली आहे. या निमित्ताने पदाचे घटनात्मक संरक्षण आणि तथाकथित विशेषाधिकारांचाही बुरखा न्यायालयाने फाडला; त्यासोबतच विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी, त्यांना मान्यता देण्यासाठी एक ते तीन महिन्यांची मुदतही निश्चित केली. त्यामुळे हा निकाल साऱ्या देशासाठी दिशादर्शक आहे.

तमिळनाडू विधानसभेने मंजूर केलेली दहा विधेयके राज्यपालांनी वेगवेगळी कारणे दाखवत अडवून ठेवली होती. त्यातील काही विधेयके तर पाच वर्षांपूर्वीची आहेत. राज्यपालांच्या असहकार्याच्या व अडवणुकीच्या भूमिकेमुळे हैराण झालेल्या द्रविड मुन्नेत्र कळघम सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर निकाल देताना न्या. बी. एम. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांनी राज्यपाल रवी यांच्यावर कडक ताशेरे ओढलेच; त्याशिवाय गेली अनेक वर्षे विधेयकांना मान्यता देण्यास मुदत आहे की नाही, यावरील संशयाचे धुकेही दूर केले.

लोकशाहीमध्ये लोकांनी निवडून दिलेले सरकारच सर्वोच्च असते. राज्यपाल हे घटनात्मक प्रमुख असले, तरी त्यांनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच कारभार करणे अपेक्षित असल्याचे घटनेत स्पष्टपणे नमूद केले आहे. सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी आपल्या निकालांतून 'राज्यपालांना समांतर सरकार चालविता येणार नाही,' असे सांगून त्यावर शिक्कामोर्तब केले आहे; मात्र कधी घटनेतील संदिग्ध तरतुदींच्या पळवाटा शोधून, तर कधी त्यांचे थेट उल्लंघन करून आपला राजकीय कार्यक्रम रेटण्यासाठी या पदाचा पूर्वीपासून वापर होत आहे. गेल्या दहा वर्षांत केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या सत्ताकाळात विशेषत: विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये राज्यपाल हे लोकनिर्वाचित सरकारची अडवणूक करीत असल्याच्या अनेक तक्रारी झाल्या. पश्चिम बंगाल, दिल्ली अशा राज्यांमध्ये सरकार आणि राज्यपालांचा संघर्ष सुरूच होता; मात्र, तमिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी या सर्वांवर कडी केली.राज्यपालांच्या अभिभाषणातून 'महिला सबलीकरण' आणि 'धर्मनिरपेक्ष' असे शब्द त्यांनी परस्पर वगळल्याने वाद निर्माण झाला होता. तसेच कोणताही अधिकार नसताना सेंथिल बालाजी यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याच्या त्यांच्या अगोचरपणाने पेच निर्माण झाला होता. दुसरीकडे विधानसभेत मंजूर झालेली विधेयके त्यांनी या ना त्या कारणाने अडवून ठेवली. खरे तर राज्यपालांना विधेयक एकदा परत पाठविता येते, विधानसभेने ते पुन्हा मंजूर केले, तर ते नाकारण्याचा कोणताही अधिकार त्यांना नाही; परंतु त्याबाबतची स्पष्ट मुदत नमूद नसल्याच्या त्रुटीचा गैरफायदा घेऊन राजभवनाकडून कालापव्यय सुरू होता. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने यामध्ये स्पष्टता आणली आहे. लोकनियुक्त सरकारच्या कामात अडसर, ही लोकशाहीविरोधी कृती असल्याचे नमूद करून न्यायालयाने राज्यपालांना विवेक बाळगण्याचा सल्ला दिला. 'राज्यपालांची कृती ही न्यायालयीन पुरावलोकनापासून मुक्त नाही,' हे न्यायालयाने निकालात केलेले भाष्य महत्त्वाचे आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता

## सप्ताह अंतर्गत विविध योजनांच्या लाभाचे वाटप

प्रतिनिधी @ लातुर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यां जयंती निमित ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत ९ एप्रिल, २०२५ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन लातूर येथे भारतीय संविधानाची उद्देशिका वाचन करण्यात आले. तसेच विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाचे प्रातिनिधिक स्वरुपात लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे.

समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या, तसेच गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेश वाटप करण्यात आले.यावेळी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त एस. एन.चिकुर्ते तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन लातूर येथील विविध कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर ग्रामीण पोलीस स्टेशन येथील ३३ बेवारस मोटार सायकलींचा १५ एप्रिलला लिलाव

प्रतिनिधी @ लातुर

**लातूर : लातूर ग्रामीण पोलीस स्टेशन येथील बेवारस असलेल्या मोटार सायकलींचा जाहीर लिलाव करण्यास लातूर प्रादेशिक परिवहन अधिकारी व लातूर तालुका दंडाधिकारी यांच्याकडून परवानगी मिळाली आहे.**

लातूर ग्रामीण पोलीस स्टेशन येथील बेवारस असलेल्या ३३ मोटार सायकलींचा लिलाव मंगळवार, १५ एप्रिल, २०२५ रोजी करण्यात येत आहे.तरी इच्छूक खरेदीदारांनी १५ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी १० वाजता लातूर ग्रामीण पोलीस स्टेशन येथे २०० रुपये किंमतीच्या बॉंडसह उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी केले आहे.




# जिल्हा पोलिसांचे खांदेपालट; कही खुशी, कही गम...!

प्रतिनिधी @ गडब

जिल्हा स्तरावरील पोलिस आस्थापना मंडळाच्या मान्यतेनुसार जिल्ह्यातील पोलिस अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या नेमणुका करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलिस प्रशासनाकडून देण्यात आली आहे. यामध्ये महाड, पोलादपूरमधील अंशतः बदल करण्यात आले आहेत. सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद रावडे यांची रोहा पोलिस ठाणे येथून पोलादपूर पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.तर पोलादपूर पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले पोलिस निरीक्षक अनिल जाधव यांची पोलादपूर येथून महाड तालुका पोलिस ठाणे येथे प्रभारी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, पोलिस निरीक्षक राजेंद्रकुमार सानप यांची नियंत्रण कक्षात नेमणूक करण्यात आली आहे.

# पाटोदा नगरपंचायतने महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुतळा

## शहरातील महात्मा फुले चौकात बसविण्यात यावा सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांची मागणी

प्रतिनिधी @ पाटोदा

पाटोदा शहरातील महात्मा फुले चौकात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुतळा बसवण्यात यावा अशी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी केली.महात्मा ज्योतिराव फुले यांनी भारतीय समाजातील गोरगरीब,शोषित आणि स्त्री वर्गासाठी क्रांतिकारी काम केले. त्यांनी शिक्षण, समानता आणि समाज सुधारणा यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे आजही त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या योगदानाची महती लक्षात घेता, पाटोदा शहरात त्यांचा पुतळा



उभारण्याची आवश्यकता आहे,महात्मा फुले यांच्या पुतळा बसवण्याची मागणी अनेक वर्षापासून असल्याने पाटोदा नगरपंचायतने त्वरित कार्यवाही करावी. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्यामुळे अनेक गोरगरीब आणि महिलांना समतेची आणि शिक्षणाची दिशा मिळाली. त्यांचा पुतळा बसविल्यास आगामी पिढीला त्यांच्या योगदानाची आठवण होईल आणि सामाजिक न्यायाच्या मार्गावर चालायला प्रेरणा मिळेल.

ही मागणी अनेक वर्षापासून असल्याने आता पाटोदा नगरपंचायत आणि सरकारने यावर लवकर निर्णय घ्यावा व पाटोदा शहरात महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुतळा बसविण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी केली आहे

# युवा पिढीने योगाचा अंगीकार करून शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपावे – उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

प्रतिनिधी @ मुंबई

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आणि वाढलेल्या स्पर्धेत युवा पिढीला आणि महिलांना ताणतणावाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर युवा पिढीने योगाचा अंगीकार करून शारीरिक व मानसिक आरोग्य जपावे, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'अंतर योग फाउंडेशन' ला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी अंतर योग फाउंडेशन उपक्रमांची माहिती घेतली. तसेच फाउंडेशनद्वारे योग आणि मानसिक आरोग्यविषयक सुरू असलेल्या कार्याचे कौतुक केले. मंत्री पाटील म्हणाले, या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, महिलांना आणि युवापिढीला योग व आध्यात्मिकतेच्या मार्गाकडे प्रवृत्त करून त्यांना मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. आजच्या काळात मानसिक आरोग्य ही महत्त्वाची बाब असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.यावेळी अंतर योग फाउंडेशनचे संस्थापक व अध्यात्मिक गुरु आचार्य उपेंद्रजी आणि अंतर योग फाउंडेशनचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची 'अंतर योग फाउंडेशन' ला सदिच्छा भेट**

# आरोग्य संस्थांच्या बळकटी करणासाठी आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने 'मिशन' राबवा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी @ मुंबई

राज्यातील आरोग्य उपकेंद्र ते संदर्भ सेवा रुग्णालयांपर्यंत असलेल्या विविध आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी विस्तृत प्रकल्प तयार करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने 'मिशन' म्हणून राबविण्यात यावा, अशा सूचनाही दिल्या.सह्याद्री अतिथीगृह येथे आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रकल्पांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर आदी उपस्थित होते. तसेच दूरसंवाद प्रणालीद्वारे आशियाई विकास बँकेचे प्रतिनिधी निशांत जैन सहभागी झाले होते.

# मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाला फरफटत भारतात आणलं

प्रतिनिधी । मुंबई

नवी दिल्ली: मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आलं आहे. एनआयएचे आयजी बत्रांच्या नेतृत्वात विशेष पथक राणाला घेऊन भारतात आलं आहे. आता तहव्वूर राणाची एनआयए मुख्यालयात चौकशी होणार आहे. मुंबई हल्ल्याच्या कटात सहभागी असलेल्या तहव्वूर राणाला २००९ साली अमेरिकेत अटक करण्यात आली होती. आता त्याला भारतात आणण्यात आलं आहे.

अमेरिकेच्या कायद्यानुसार भारतात खटला चालणार

अमेरिकन कोर्टाने अनुमती दिलेल्या कलमांनुसारच तहव्वूर राणावर खटला चालवण्यात येणार आहे. अमेरिकेत खटला चालला असताना भारतात पुन्हा खटला का चालवता? असा सवाल तहव्वूर राणानं केला होता. मात्र भारताने राणाचा दावा खोडून काढत आंतरराष्ट्रीय कायद्यांचा दाखला दिला. सोबतच राणावरील आरोप गंभीर असल्याने भारततही खटला चालवू शकतो असा दावा भारत सरकारच्या वकिलांनी अमेरिकन कोर्टात केला होता.

इस्त्रायलकडून स्वागत

मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाचं इस्त्रायलकडून स्वागत करण्यात आलं आहे. दहशतवाद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी भारत सरकारच्या चिकाटीबद्दल आभार असं इस्त्रायलचे भारतातील राजदूत रुवेन अझर यांनी म्हटलं.

दरम्यान, तहव्वूर राणाला आझाद मैदानात सार्वजनिकरित्या फाशी द्या अशी मागणी शहीद तुकाराम ओंबळेंचे भाऊ एकनाथ ओंबळेंनी केली आहे. कसाबला फाशी देण्यास विलंब झाला, यावेळी तसं करू नका अशी मागणीही एकनाथ ओंबळे यांनी केली.



नवी दिल्ली: मुंबईतील २६/ ११ दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आलं आहे. एनआयएचे आयजी बत्रांच्या नेतृत्वात विशेष पथक राणाला घेऊन भारतात आलं आहे. आता तहव्वूर राणाची एनआयए मुख्यालयात चौकशी होणार आहे. मुंबई हल्ल्याच्या कटात सहभागी असलेल्या तहव्वूर राणाला २००९ साली अमेरिकेत अटक करण्यात आली होती.

## पाकिस्तानने हात झटकले

तहव्वूर राणा भारतात आणण्यात आल्यानतंर पाकिस्ताननं मात्र राणापासून हात झटकले आहेत. राणा हा कॅनडाचा नागरिक आहे, त्याचा पाकिस्तानशी आता संबंध नाही, असं पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं. राणानं गेल्या दोन दशकांपासून त्याच्या पाकिस्तानशी संबंधित कागदपत्रांचं नूतनीकरण केलं नसल्याचा दावाही पाकिस्ताननं केला. राणाच्या चौकशीतून पाकिस्तानचा पर्दाफाश होईल, असं कायदेतज्ज्ञ बोलत आहेत. पण त्याआधीच पाकिस्ताननं राणापासून फारकत घेतल्याचं दिसून येतंय.

# राजकिशोर मोदी यांच्याकडून जगाला अहिंसेच्या मार्गावर नेणाऱ्या भगवान श्री महावीर यांच्या प्रतिमेचे पुजन व जैन बांधवास शुभेच्छा

अंबाजोगाई(प्रतिनिधी):- संपूर्ण जगाला अहिंसेचा संदेशासोबतच अहिंसेच्या मार्ग दाखवणाऱ्या भगवान श्री महावीर यांच्या जयंतीनिमित्त आज अंबाजोगाई शहरात निघालेल्या भगवान श्री महावीर यांच्या भव्यदिव्य अशा मिरवणुकी दरम्यान महावीर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन शहरातील सर्व जैन बांधवांस भगवान श्री महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.या मिरवणुकीत अंबाजोगाई शहरातील सर्व जैन महिला व पुरुष पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते.

याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की जगाला अशांती व हिंसेच्या प्रवृत्ती पासून दूर नेण्यासाठी भगवान श्री महावीर यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी ध्यान धारणा व तपस्या प्रारंभ केली. त्यानंतर धर्म व अहिंसा याचा प्रचार जगभर केला. वयाच्या ७२ व्या वर्षी महावीरांचे निधन झाले. जैन बांधव हे भगवान श्री महावीर यांच्या जन्म व निधनाच्या दिवशी घरोघरी दिवे लावतात. भगवान महावीर म्हणतात की, कळत नकळत देखील आपल्या हातून कोणाची हिंसा होणे हे अयोग्य आहे. त्याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये किंवा कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये अशी भगवान श्री महावीरांची शिकवण असल्याचे मोदी यांनी नमूद केले. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये, स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतः प्रत्ति द्वेष वाढवत असतो असेही भगवान श्री महावीरांचे मत होते अशी स्पस्टोक्ती राजकिशोर मोदी यांनी यादरम्यान दिली. सध्या सर्वत्र राजकीय तथा सामाजिक दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा वातावरणात भगवान श्री महावीरांची शांती तथा अहिंसेची शिकवण खऱ्या अर्थाने उपयोगी पडणार असल्याचे परखड मत राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

आपल्या स्वतःविषयी असणारा भाव अन्य प्राण्यांविषयी देखील असू द्यावा. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा. मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो असे भगवान श्री महावीर म्हणत असत. स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पाहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणाऱ्याकडून कळत नकळत हिंसा करतो असे भगवान श्री महावीर यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट देणे किंवा ईजा पोचवणे टाळावे अशी शिकवण भगवान श्री महावीर आपल्या प्रत्येक प्रवचनातून देत असत असेही मत राजकिशोर मोदी यांनी यावेळी मांडले. साध्य




# सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले

प्रतिनिधी @ बीड

महात्मा ज्योतिराव फुले यांचे वंशज गोऱ्हे, मूळचे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कटगुण या गावाचे. महात्मा फुले यांचे पणजोबा यांचे कटगुणांच्या कुलकर्णीबरोबर भांडण होऊन विकोपाला गेले म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पंजोबांनी कुटुंबासहित कटगुण गाव सोडण्याचा निर्णय घेतला व ते सर्व कुटुंबासहित पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील सासवड जवळ खानवडी या गावी आले. तेथं त्यांनी शेत जमीन घेऊन घर बांधले. ग्राम पंचायत मालमत्ता नोंदवही मध्ये आजही जमीन व घराची नोंद आहे. (पुरंदर तालुक्यात स्मारक समितीच्या वतीने १९९५ मध्ये स्मारक बांधून उद्घाटन केले) ज्योतिरावांचे आजोबा शेटीबा गोऱ्हे खानवडी येथून पुण्याला आले. पुण्यात घर बांधले. शेटीबाना राणोजी, कृष्णा व गोविंद ही तीन मुले होती ते तिन्ही मुले पुण्याच्या पेशव्यांना फुले पूरवण्याचा व्यवसाय करत असत. त्यांच्या कामावर खुश होऊन पेशव्यांनी त्यांना ३५ एकर जमीन इनाम दिली. गोऱ्हे कुटूंबाच्या फुलांच्या व्यवसायावरून लोक त्यांना फुले म्हणू लागले. म्हणून त्यांनी गोऱ्हे आडनाव बदलून फुले आडनाव लावले. तेव्हा पासून फुले आडनाव प्रचलित झाले.

सन १८१८ सली पेशवाईचा अस्त झाला व पुण्यावर इंग्रज राजवट अंमलात आली. पेशवे कालीन समाज व्यवस्थेमध्ये जातिभेद व वर्णभेद रूढ होते. सामाजिक विषमता, अज्ञान चालीरीती, अंधश्रद्धा , सामाजिक गुलामगिरी, विधवा विवाह, बालविवाह बालहत्या, विधवांचे केश कापणे, स्पृश्य- अस्पृश्य – शूद्र, अती शूद्र इत्यादी सामाजिक प्रथा रूढ होत्या. समाजात उच्चवर्गायाचे वर्चस्व होते. व त्यांचे सामाजिक गुलामगिरीत पिचलेल्या शूद्र- अतिशूद्रावर अत्याचार होत होते. अशा या कठीण काळात महात्मा फुले यांचे वडील गोविंदराव फुले आपल्या दुकानात भाजी व फुले विक्रीचा व्यवसाय करीत होते. याच सुमारास गोविंदराव फुले यांचा विवाह झगडे पाटलांच्या मुलीसोबत झाला मुलीचे नाव चिमणाबाई होते. त्यांना दोन मुले झाली पहिला राजाराम व दुसरा क्रांतीसुर्य ज्योतिराव. ज्योतिरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी गंज पेठ पुणे येथे झाला. हाच वाडा फुले यांच्या क्रांतीकार्याचा साक्षीदार आहे.

ज्योतिरावांचे प्राथमिक शिक्षण पंतोजीच्या शाळेत १८३४ मध्ये सुरू झाले परंतु ज्योतिरावांच्या चाणाक्ष बुद्धिमत्तेमुळे त्यांच्या वडिलांना काही दृष्ट लोकांनी सांगून त्यांचे शिक्षण बंद केले. गोविंदरावांनी मग त्यांना घराच्या कामाला जुंपले पण हुशार व कुशाग्र बुद्धीच्या ज्योतिरावने वाचन आणि लेखन चालूच ठेवले. त्यांच्या घराशेजारी मुन्शी बेग व लिजीट इंग्रज साहेब राहत होते. त्यांना ज्योतिरावंच असामान्य बुद्धिमत्तेची जाणीव झाली व त्यांनी दोघांनी गोविंदरावांना सांगून तब्बल तीन वर्षांनी म्हणजे १८४१ साली इंग्रजी मिशनच्या शाळेत ज्योतिरावांना पाठविण्यास गोविंदरावांना भाग पाडले. पददलित समाजावर होणारे अन्याय व अत्याचार पाहून ज्योतिरावांचे मन अतिशय दुःखी होते असे याच काळात ज्योतिरावांना थॉमस नावाच्या बंडखोर इंग्रज लेखकाचा एक ग्रंथ वाचण्यात आला. या ग्रंथाच्या वाचनामुळे ज्योतीरावांना आपण देशासाठी व देशातील पददलित समाजासाठी काही तरी करावयास पाहिजे असे वाटू लागले. ज्योतिरावंनी १८४१ ते १८४७ या काळात इंग्रजी शाळेतील माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.याच काळात त्यांचे एक उच्चवर्णीय मित्रांच्या लग्नाला ज्योतीराव निमंत्रणावरून गेले असताना त्यांना त्या लग्नाच्या वराती मधून तू शूद्र आहेस म्हणून अपमानित करून हाकलून दिले आणि त्याच ठिकाणी त्या



शब्दांकन...
**लक्ष्मण ढवळे दादा**
मराठवाडा विभागीय अध्यक्ष
सत्यशोधक ओबीसी परिषद.

अपमानातून क्रांतीसुर्याचा उदय झाला. आता आपण दलित पददलित समाजासाठी काहीतरी करायचेच अशी खून गाठ ज्योतिरावनी मनाशी बांधली आणि त्या परिस्थितीचा अभ्यास त्यांनी सुरू केला. त्याच वेळेस वयाच्या १२ व्या वर्षी इ.स. १८४० मध्ये त्यांचा विवाह सातारा जिल्ह्यातील नायगाव येथील खंडूजी नेवसे पाटील यांची मुलगी सावित्री हिच्या बरोबर झाला. लग्ना वेळेस सावित्रीबाईचे वय ९ वर्षे होते. सावित्रीबाई यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. सावित्रीबाईंनी आपल्या पतीच्या ज्योतीरावांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यास मोलाची मदत केली. ज्योतिराव बरोबर हाल आपेष्टा व कष्ट सहन करून स्त्री शिक्षणाचा पाया सावित्रीबाईंनी घातला या देशातील चालीरीती अंधश्रद्धा अज्ञान सामाजिक गुलामगिरी उच्चवर्णीयांचे खालच्या वर्गावर होणारे अत्याचार बालविवाह, बालहत्या, विधवांचे केसकर्तन, इत्यादी अनिष्ट चालीरीतीमुळे कर्मकांडाच्या दलदली मध्ये पिचलेल्या खालच्या वर्गाला त्यांनी जाणीव करून दिली तसेच सामाजिक क्रांती करून पददलित समाजाला आपल्या हक्काची जाणीव करून दिली. राजकीय गुलामगिरी पेक्षा सामाजिक गुलामगिरी अत्यंत घातक आहे याची जाणीव जेव्हा महात्मा फुले यांना झाली तेव्हा त्यांनी या मागचे कारण शोधले आणि त्यांच्या लक्षात आले की हे सर्व अज्ञानामुळे, शिक्षण नसल्यामुळे होते. सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी शाळा काढून पददलित व महिलांना शिक्षण देणे गरजेचे आहे हे लक्षात येताच महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात आपल्या घरापासून केली पत्नी सावित्रीबाई व मावस बहीण सगुणाबाई यांना लिहिण्यास व वाचण्यास शिकवले व १८४७ साली नॉर्मल स्कूल मधून अध्यापन शिक्षणक्रम पूर्ण केले. ज्योतिरावांना सर्व लोक आदाराने तात्या म्हणत. ज्योतिराव फुले यांनी घोडदौड, तलवार, दांडपट्टा, पैलवानी यांचे ही शिक्षण घेतले होते.

इकडे सावित्रीबाई यांनी अध्यापन अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर १८४८ साली पुण्याच्या बुधवार पेठेत भिडे वाड्यात मुलीची पहिली शाळा सुरू केली. ही देशातील पहिली मुलीची शाळा होय या शाळेतील पहिल्या ६ विद्यार्थिनी मुलींमध्ये ४ ब्राह्मण १ मराठा व १ धनगर अशा ६ मुली होत्या. वर्ष अखेर सर्व जाती-धर्माच्या मुली शिक्षण घेऊ लागल्या. अशा रीतीने सावित्रीबाई देशातील पहिल्या भारतीय महिला शिक्षिका झाल्या त्यावेळेस पददलित जातीच्या लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. स्त्रियांना चूल आणि मूल यांच्या पलीकडे कोणताच अधिकार नव्हता स्त्री शिक्षणाबद्दल अनेक भ्रामक कथा होत्या. स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे पाप समजले जाई. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी अनेक संकटावर मात करून आपले शिक्षणाचे कार्य चालू ठेवले. ११ मे १८४८ रोजी पुण्यात मुला मुलीची दुसरी शाळा सुरू केली. या शाळेच्या ज्योतिरावांची मावस बहीण मुख्याध्यापिका झाल्या फातिमा शेख या मुस्लिम समाजाच्या महिला सावित्रीबाई यांना मदत करत मुस्लिम समाजाच्या असूनही फातिमा शेख यांनी धर्मांध वृत्तीला तोंड देत अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर १८५१ मध्ये चिपळूणकर वाडा व रास्ता पेठेत मुलींच्या शाळा सुरू केल्या या महान कार्याबद्दल मेजर कॅन्डी यांच्या हस्ते ज्योतिरावांचा व सावित्रीबाईचा जाहीर सत्कार झाला. स्त्री मुक्ती चळवळीचे जनक म्हणून पीडित स्त्रियांचे उद्धार करते म्हणून ज्योतीरावांना गौरवविले तर आदर्श शिक्षिका म्हणून सावित्रीबाई यांना गौरवविले ज्योतिरावांनी १८५५ रोजी तृतीय रत्न हे नाटक लिहिले तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर जून १८६९ मध्ये पोवाडा लिहिला. ब्राह्मणाचे कसब, शेतकऱ्यांच्या आसूड, गुलामगिरी, इत्यादी ग्रंथ लिहिले. अशा महानसामाजिक क्रांतीच्या महापुरुषाचे २८ नोव्हेंबर १८९० रोजी दुःखद निधन झाले. तेव्हा मोहनदास करमचंद गांधी म्हणाले ज्योतिराव फुले सचमुच महात्मा थे ....महात्मा जोतीराव फूले यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

जय ज्योती जय क्रांती...!

## ४ कोटी ३२ लाख आफु लागवड प्रकरणातील आरोपी रामहारी तिडके यास जामीन मंजुर

प्रतिनिधी @ बीड

मौजे पिंपरवाडा येथील रामहारी कारभारी तिडके रा. पिंपरवाडा ता. धारुर यांनी त्यांचे शेतात गट नं.३३ मध्ये आफुची लागवड केल्या प्रकरणात धारूर पोलीस स्टेशन येथील गु.र.नं. ५७/२०२५ अन्वये गुन्हा दाखल झाला. या प्रकरणी पोलीस स्टेशन धारुर यांनी पंचनामा करुन आरोपीस अटक केली होती. सदरील प्रकरणी केज न्यायालयात जामीन अर्ज क्र. ४६/२०२५ यामध्ये दिनांक ०८.०४.२०२५ रोजी मा. साहेबांनी आरोपीचा जामीन मंजुर केलेला आहे.

या प्रकरणाकडे धारुर, केज तसेच बीड जिल्ह्यातील सर्वांचे लक्ष लागले होते. या प्रकरणात बीड येथील फौजदारी नामांकित वकील ॲड. बाळासाहेब कोल्हे, ॲड. प्रभाकर बाबासाहेब आंधळे व ॲड. संजय उर्फ चंदु जटाळ पाटील पालवनकर यांनी



आरोपीच्या वतीने काम पाहिले, त्यांना सहकार्य म्हणुन ॲड. सुदर्शन मुंडे, ॲड. गणेश कोल्हे, ॲड. सचिन केकान, ॲड. सौ. उषा नामदेव नेहरकर (आंधळे) यांनी केले. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## महामानव अभिवादन ग्रुपच्या मोफत शिकवणी वर्गात वाचाल तर वाचाल तर्फे शालेय साहित्याचे वाटप

प्रतिनिधी @ बीड

महामानव अभिवादन ग्रुप २०२० पासून राजगृह बुद्धविहार भीम नगर जुना मोंढा रोड परिसर व प्रकाश आंबेडकर नगर बीड येथे प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांकरिता मोफत शिकवणी वर्ग चालविण्यात आहेत. वार्षिक परीक्षेच्या निमित्ताने दोन्हीही वर्गातील ५३ विद्यार्थ्यांना परीक्षेकरता आवश्यक ते शालेय साहित्य ( कंपास, रायटिंग पॅड व पेन) चे वाटप वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनाला तर्फे महामानव ग्रुपचे अध्यक्ष जी. एम. भोले डॉ. जगदीश, वाघमारे शिक्षक रवींद्र टेकाळे, शिक्षिका विशाखा वाघमारे, यांच्या हस्ते वाटप करण्यात आले व परीक्षेकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे म्हणाले की नियोजित



अभ्यासाकरिता शिक्षक अतुलनीय मेहनत घेत असून विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व, गायन, व चित्रकला या कलागुणाकडेही उत्कृष्ट प्रकारे मार्गदर्शन करत आहेत व मेहनत घेत आहेत. त्याबद्दल गुरुजनांचे महामानव अभिवादन ग्रुप तर्फे व वाचनालयातर्फे त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.याप्रसंगी शिकवणी वर्गाबद्दल आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी कु.अमृता चौगुले हिने आज पौर्णिमेच्या राती दीन दुबळ्यांच्यासाठी भीम माझा ग दिल्लीत भाषण देई असे हृदयपर्शी भीम गीत गाईले सर्व उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तसेच भूमिका चौगुले या विद्यार्थिनीने शिकवणी वर्गाचा कसा फायदा होत आहे, ते आपल्या मनोगतात व्यक्त केले. जी.एम.भोले यांनी मंत्रमुग्ध करणाऱ्या गीताबद्दल अमृता चौगुले हिचा रोख रक्कम देऊ सत्कार केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुढे म्हणाले की शिकवणी वर्गाचा विद्यार्थी योग्य प्रकारे लाभ घेत आहेत, याबद्दल समाधान व्यक्त केले . इथून पुढे तिसरा मोफत शिकवणी वर्ग गरजू व होतकरू विद्यार्थ्यांकरिता बीड शहरात सुरू करण्याचा मानस व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. जगदीश वाघमारे यांनी केले. कार्यक्रमास कॅप्टन राजाभाऊ आठवले, डी.एम.राऊत, सेवानिवृत्त एल.आ.यसी. प्रबंधक यु.एस.वाघमारे प्रा. अशोक गायकवाड, प्रशांत वासनिक, के एस वाघमारे, बि.डी. तांगडे, एस.एस. सोनवणे, संघमित्रा वाघमारे व बहुसंख्येने सदस्य,विद्यार्थी उपस्थित होते. सरणातयने कार्यक्रमाची सांगत झाली.

## धोंडराईत ईद मिलाप कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी @ धोंडराई

गेवराई तालुक्यातील धोंडराई हे गाव नेहमीच बंधुभाव जपत आपल्या गावाच्या सामाजिक आणि धार्मिक परंपरेचे जतन व संवर्धन करण्यात अग्रेसर असते.गावाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे हिंदू मुस्लिम जैन आदी धर्मांचे व विविध जाती आणि संप्रदायाचे लोक राहतात पण गावातील सर्व सण वार उत्सव बंधुभावाने व गुण्यागोविंदाने येथे साजरे केले जातात. गावच्या मस्जिद मध्ये गेल्या ९ वर्षांपासून संपूर्ण ग्रामवासीयांसाठी शिरखुर्मा व ईदच्या पदार्थांची मोठी मेजवानी आयोजित केली जाते.

शुक्रवारी संध्याकाळी ७ वाजता गावाचा मस्जिदच्या प्रांगणात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित सर्व ग्रामस्थांचे शफीक काझी यांनी शब्द सुमनाने स्वागत केले तसेच या प्रसंगी सर्व ग्रामस्थांच्या वतीने श्री तात्यासाहेब मेघारे यांनी सर्व मुस्लिम



बांधवांना ईदच्या शुभेच्छा देऊन गावाच्या सामाजिक परंपरेचे व धार्मिक सलोख्याचे दाखले दिले.धोंडराई येथील सर्व धर्मीय बंधू आमच्या आनंदात मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवतात म्हणून सर्वांचे आभार काझी मुशाहेद यांनी मानले .

## बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या नुतनीकरणासाठी लिंबागणेश येथे रास्तारोको आंदोलन

प्रतिनिधी @ लिंबागणेश

बीड पंचायत समितीच्या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण गेल्या ९ महिन्यांपासून रखडले असुन बांधकाम कामगार (नुतनीकरण) पुन्हा नोंदणी करणे आवश्यक असुन प्रत्येक वर्षी नोंदणी करणे गरजेचे आहे मात्र यासाठी ९० दिवस काम चहा यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत. त्यामुळे शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळ या योजनेंतर्गत विविध कल्याणकारी योजना जसे की कामगारांच्या मुलांना व कुटुंबियांना मिळणाऱ्या मुला मुलींच्या शिक्षणासाठी

मदत,सामाजिक सुरक्षा, आर्थिक मदत, आरोग्य सुविधा यापासून वंचित असुन शासन स्तरावरून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आधिकाऱ्यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दुर करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१० गुरूवार रोजी अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते

**पंचायत समितीच्या आडमुठेपणामळे नुतनीकरण रखडले – डॉ.गणेश ढवळे**



पाटोदा दरम्यान लिंबागणेश छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड , मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आली असुन निवेदन मंडळ अधिकारी श्रीधर साळुंके,तलाठी गणपत पोतदार,तलाठी शेख गफुर,पो. हे. संतोष राऊत, नवनाथ मुंढे, मधुकर तांदळे यांनी स्विकारले. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात , रमेश गायकवाड, पांडुरंग वाणी विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, दादा गायकवाड, शेख खाजु,

बांधकाम मिस्त्री सय्यद रफिक, सुधाकर बागल,सय्यद सलीम, सय्यद अकबर, सय्यद आयुब, विलास जाधव, शेषेराव तागड, श्रीराम तागड, भिमराव बोराटे,बंकट लगास, हनुमान अंकुशे,शिवराम गायकवाड, तुकाराम गायकवाड, बन्सी निर्मळ, रामदास निर्मळ, सुधीर क्षीरसागर, सय्यद रियाज, बाळकृष्ण अंकुशे ,बंकट लगास,सय्यद फैय्याज आदी सहभागी होते.

## भगवान महावीर यांच्या जयंती निमित्त भव्य शोभा यात्रा संपन्न

प्रतिनिधी @ बीड

जैन धर्माचे चोवीसावे तीर्थकर भगवान महावीर यांच्या जयंती निमित्त बीड शहरात भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सुभाष रोड येथील अहिंसा चौक या ठिकाणी आज सर्वांनी भगवान महावीर यांना वंदन करून शोभायात्रा प्रारंभ झाली. यावेळी माजी मंत्री सुरेश नवले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे




पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, आयोजक अशोकसेठ लोढा, ललित अब्बड, अमित पगारिया, सुशील पिंगळे, संदीप उबाळे, सतीशसिह परदेशीं, दिलीप पवार सह आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## गुन्हेगारांचा बीड जिल्हा ही ओळख पुसण्याचा प्रयत्न सुरेश जाधव यांनी केला – उल्हास गिराम

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र टीव्ही जार्नालिझमची मातृसंस्था असलेल्या टिव्ही जार्नालिझम असोसिएशन महाराष्ट्र राज्यच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट ग्रामीण पत्रकार प्रथम पुरस्कार बीडचे भूमीपुत्र सुरेश महाराज जाधव (न्यूज १८ लोकमत बीड जिल्हा प्रतिनिधी) यांना मिळाला. त्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जाधव यांचा सत्कार केला.

पत्रकार सुरेश जाधव यांनी बीड च्या पत्रकरिता क्षेत्रात मनाचा तुरा रोवला असुन, गुन्हेगारांचा बीड जिल्हा ही ओळख पुसण्याचा प्रयत्न सुरेश जाधव यांनी केला असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. यावेळीजिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हा प्रमुख राजु भाऊ माहुवाले, संदीप उबाळे, सतीशसिह परदेशी यांनी ही पत्रकार जाधव यांना शुभेच्छा दिल्या.

**सर्वोत्कृष्ट ग्रामीण पत्रकार प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरले बीडचे भूमीपुत्र सुरेश महाराज जाधव**



# छत्रपती शिवाजी महाराज सेवाभावी संस्थेच्यावतीने बसस्थानकात पाणपोई

### सतीशराव निर्वळ यांच्याकडून अडीच लाखाच्या आरो प्लांटचे लोकार्पण

प्रतिनिधी @ मंठा

मंठा बसस्थानकात बुधवार दिनांक ९ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज सेवाभावी संस्था व माऊली अर्बन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने पाणपोई सुरू करण्यात आली.याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सतीशराव निर्वळ, परतूर डेपो मॅनेजर श्रीमती माधुरी देशमुख, वाहतूक नियंत्रक नारायण बेंद्रे, शेख बशीर, वृत्तपत्र वितरक वसंतराव वाघमारे, माऊली खरात, गजानन निर्वळ, अमोल मस्के, कालिदास निर्वळ, रवी चव्हाण, रामकिसन इक्कर, प्रभाकर कदम, हनुमान बोने, महेश आवचार, लखन रामपूरकर, शुभम घाडगे, सुनील उदावंत, दिगंबर बादाडे, भीमराव चव्हाण, पत्रकार बांधवासह आदींची उपस्थिती होती.

मागील दहा-बारा वर्षांपासून सेवाभावी वृत्ती असलेले सतीशराव निर्वळ संस्थेच्या माध्यमातून जनकल्याणार्थ पाणपोई लावत होते. त्यानंतर काही वर्षे जारच्या पाण्याची व्यवस्था केली. यंदा मात्र त्यांनी थेट



अडीच लाखांचा आरो प्लांट बसवून दिला आहे. सोबतच वॉटर कुलरच्या माध्यमातून प्रवाशांना शुद्ध आणि थंड पाण्याची सोय केली आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी सतीशराव निर्वळ म्हणाले, समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून मिळते. उन्हाळ्यात प्रवाशांची होणारी गैरसोय पाहून पाणपोई सुरू करण्याचा निर्णय घेतला. गेल्या काही वर्षांत या उपक्रमातून हजारो लोकांना दिलासा मिळाला आहे. या वेळी आरो प्लांटसह थंड पाण्याची सुविधा देताना खूप समाधान वाटते. ही सेवा पुढेही अविरत सुरू राहील यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. त्यांच्या या सामाजिक कार्याचे सर्व उपस्थितांनी व प्रवाशांनी कौतुक केले.

### विभागीय आयुक्त दिलीप गावडे साधणार

# नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद

### ११ एप्रिल रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत 'संवाद मराठवाड्याशी' उपक्रम

प्रतिनिधी @ छत्रपती संभाजीनगर

मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यातील नागरिक आपल्या विविध कामानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. आपल्या प्रशासकीय समस्यांचे निवारण करून घेण्यासाठी नागरिक येत असतात, मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा 'संवाद मराठवाड्याशी' हा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील या नाविण्यपूर्ण उपक्रमाचा प्रारंभ येत्या ११ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

विभागीय आयुक्त श्री गावडे यांच्या संकल्पनेतून 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' या उपक्रमाची सुरूवात झाली आणि संपूर्ण प्रशासन थेट गावात पोचले. या उपक्रमाच्या यशानंतर विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय कामानिमित्त येण्यासाठी नागरिकांना होणारा त्रास थांबविण्यासाठी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे 'संवाद मराठवाड्याशी' या उपक्रमाची सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आहे. ११ एप्रिल रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत विभागीय आयुक्त श्री गावडे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत संवाद साधणार आहेत. श्री. गावडे यांच्यासमवेत यावेळी विभागीय पातळीवरील प्रशासकीय अधिकारीही उपस्थित असणार आहेत. प्रत्येक आठवडयात दर बुधवारी ४ ते ६ यावेळेत आयुक्त नागरिकांशी संवाद साधतील. प्रत्येक संवादावेळी प्रशासकीय विभाग व विषय ठरविण्यात येणार असून यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी सबंधित विषयावर विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत.


# सांगवी पाटण येथे दोन दिवसीय भैरवनाथ यात्रेला सुरुवात

### पंचक्रोशीतील नाथ भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा - सरपंच दत्तात्रय खोटे

प्रतिनिधी @ आष्टी

तालुक्यातील सांगवी पाटण येथील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे भैरवनाथ मंदिर असून येथील यात्रेमध्ये दि. ११ एप्रिल २०२५ रोजी श्रीक्षेत्र पैठण, नागतळा येथून आलेल्या कावडीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. दि. १२ एप्रिल रोजी सकाळी वाजत गाजत शेरणी, दंडवत, लोटांगण घेऊन भाविक भक्त नवस पूर्ण करतात, दुपारी ३ ते ६ यावेळेस मुख्य आकर्षण बँजो, डिजे, डोल, ताशा, लेझिम पथक, देखावा, युवकांचा डान्स, भव्य दिव्य काठी मिरवणूक कार्यक्रम संपन्न होणार आहे.

रात्री ६ ते ८ यावेळेस वाटण्याची जुनी परंपरा अजूनही जुनी प्रथा कायम आहे. नंतर रात्री छबिना काढून गावात रात्रभर मिरवणूक काढण्यात येणार आहे, पहाटे शोभेची दारूची आतिश बाजी करण्यात येते, यावेळी यात्रे मध्ये खेळणी दुकाने, खाऊची दुकाने, महाप्रसादाची दुकाने असे अनेक प्रकारचे दुकाने थाटली जातात. यात्रेमध्ये भावी नवरदेव यांची दर्शनासाठी जास्त गर्दी होते तद्नंतर दि.



१३एप्रिल या दिवशी कुस्त्याचा हंगामा संपन्न होणार आहे, पंचक्रोशीतील पाटण, कोहिनी, खिळद, लिंबोडी, बावी, डोईठाण, सुरुडी, धामणगाव, कारखेल, लमाणतांडा, पुणे, मुंबई, अहिल्यानगर तसेच महाराष्ट्रातून भाविक भक्त भैरवनाथांचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. तरी भावीक भक्तांनी दर्शनाचा लाभ मोठ्या प्रमाणात घ्यावा असे आवाहन सरपंच दत्तात्रय खोटे आणि समस्त ग्रामस्थ सांगवी पाटण यांनी केले आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ तर्फे पथनाट्य, व्याख्यान आणि हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात साजरा

प्रतिनिधी @ निगडी

दिनांक ८ एप्रिल रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या महिला विभागातर्फे पथनाट्य, व्याख्यान व चैत्रगौर हळदी कुंकू असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात देवीच्या प्रार्थनेने करण्यात आली.

त्यानंतर चैत्रगौरीचे पुजन प्रमुख वक्त्या सौ . कल्पनाताई क्षीरसागर, पथनाट्याच्या प्रमुख सौ. ज्योतीताई कानेटकर, महिला विभागाच्या कार्याध्यक्षा सौ. अश्विनी अनंतपुरे, सहकार्याध्यक्षा सौ. वैदेही पटवर्धन व अध्यक्षा सौ. अनघा कानडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर कुटुंब प्रबोधन या विषयावर ज्योतीताई कानेटकर व त्यांच्या सहकारी मैत्रिणींनी अत्यंत सुंदर रित्या पथनाट्य सादर केलं.

कुटुंब म्हणजे शक्ती, ताकद हे विचार त्यांनी मांडले. छोट्या छोट्या नाटुकलीतून त्यांनी लोप पावत चाललेली कुटुंब पद्धती तसेच बदलणारे विचार यावर प्रकाश टाकला. कुटुंब संवर्धन करणे ही काळाची गरज आहे असे विचार मांडले. त्यानंतर ज्योती ताईंचा व सहकाऱ्यांचा सत्कार महिला विभागाच्या अध्यक्षा सौ. अनघा कानडे यांनी केला. प्रमुख वक्त्या सौ. कल्पनाताई क्षीरसागर यांचा परिचय सौ. वीणा महाजन यांनी करून दिला. कल्पनाताईंचा सत्कार सौ अश्विनी अनंतपुरे ,सौ वैदेही पटवर्धन व सौ अनघा कानडे यांनी केला. कल्पनाताईंनी स्वयंपाकघर एकऊर्जास्रोत या विषयावर आपले विचार शांत, गोड अशा आपल्या मधुरवाणीने मांडले. स्वयंपाकघरात अन्नपूर्णेचा वास असतो, सर्व कामाचा स्रोत हे स्वयंपाकघरच असते. तिथे नेहमी आपण नतमस्तकच व्हावं कारण पोट आहे तरच संरक्षणाचा कोट आहे असे विचार त्यांनी मांडले. स्वयंपाक म्हणजे स्वतः केलेली पाकसिद्धी . स्वयंपाक करताना नेहमी अग्नीसंस्कार करून , पुजा करून श्लोक म्हणत



स्वयंपाक करावा म्हणजे पदार्थात सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन ती ऊर्जा घरातील व्यक्तींना अन्नातून मिळते. जसं देह देवाचे मंदिर तसेच अन्नपूर्णेचे वसतीस्थान म्हणजे स्वयंपाकघर असे पवित्र विचार त्यांनी मांडून सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.त्यानंतर कार्यक्रमाची सांगता सर्व महिलांना हळदीकुंकू देऊन कैरीची डाळ, पन्ह, भिजवलेले हरभरे देऊन करण्यात आली.

या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला विभागाच्या कोषाध्यक्षा सौ. संपदा पटवर्धन यांनी केले तर प्रास्ताविक सौ. हर्षदा पोरे यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या शेवटी निवेदन व आभार सौ. राधिका सुखटणकर यांनी केले.

असा हा महिलांना हवाहवासा वाटणारा चैत्रगौरीच्या हळदीकुंकूवाचा कार्यक्रम दोन उत्कृष्ट विषय घेऊन अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमावेळी लेखिका पत्रकार सौ माधुरी वैद्य डिसोजा यांच्यासह जवळजवळ १०० महिला उपस्थित होत्या.

# अंबड येथे सदभावना ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी @ अंबड

जमआत-ए-इस्लामी हिंद अंबडच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सदभावना ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी शुक्रवार संध्याकाळी ठीक सात वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ करण्यात आलेले आहे. ईद मिलन कार्यक्रमांमध्ये सर्वांनी उपस्थित राहण्याचे आव्हान जमआत-ए-इस्लामी हिंद अंबड शाखेचे अध्यक्ष मौलाना सादेक मजाहिरी यांनी केले आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून संत साहित्याचे गाढे अभ्यासक श्री डॉ.सय्यद रफिक पारनेरकर हे राहणार आहे.विशेष उपस्थिती मध्ये मराठा संघर्ष योद्धा श्री मनोज जरांगे पाटील हे राहणार आहे. तसेच जालना लोकसभेचे विद्यमान खासदार डॉ.कल्याणराव काळे,अंबड-बदनापूर मतदार संघाचे आमदार श्री.नारायण भाऊ कुचे, घनसावंगी मतदार संघाचे आमदार श्री.हिकमत दादा उढाण,तसेच मा.आमदार श्री.राजेश भैय्या टोपे,मा.आमदार विलास बापू खरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, दिपकभैय्या ठाकूर,तारेख चाऊस, समद बागवान,केदारदादा कुलकर्णी, इंजि. बाबासाहेब भोजने, प्रमुख वक्ते मध्ये डॉ. राधेश्याम जयस्वाल प्रसारक, संत निरंकारी मंडळ जालना. श्री ह भ प गणेश महाराज कांगणे रामायणचार्य अंबड, भदंत शिवली शाक्यपुत्र नालंदा बुद्ध विहार नागेवाडी जालना, आचार्य दिवाकर बाबा जामोदेकर महानुभव पंथ अंबड, रवींद्र प्रभाकर मसलकर जैन दर्शनाचार्य अंबड, सुशांत सुधाकर पाटोळे चर्च फादर अंबड, असे प्रमुख वक्ते आणि मान्यवर उपस्थित राहणार आहे. अंबड शहरातील तमाम नागरिकांना विनंती की सर्वांनी या कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहावे.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवार रोजी सोपान म. इंगळे शास्त्री यांचे कीर्तन

प्रतिनिधी @ बीड

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील आठवी पुण्यतिथी चैत्र शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. सोपान



महाराज इंगळे शास्त्री अध्यक्ष इंगळे महाराज परमार्थ आश्रम चिंचवड गाव यांचे शनिवार दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व गंगाधर श्रीमंतराव घुमरे, रमेशभाऊ विश्वनाथ घुमरे, बाळासाहेब विश्वनाथ घुमरे, अण्णासाहेब तुकाराम लांडे यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# श्री रमाकांत मुंडे यांना या वर्षी चा सांस्कृतिक कलादर्पण पत्रकारिता पुरस्कार

प्रतिनिधी @ पाटोदा

२७ वा चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठान प्रस्तुत सांस्कृतिक कलादर्पण गौरव पुरस्कार २०२५ भव्य चित्रपट महोत्सवाची सुरवात काल प्रसिद्धअभिनेते संतोष जुवेकर, निर्भिड लेखचे संपादक, नाट्य निर्माते कांतिलाल कडू आणि निर्माते दत्ताजी जवळगे यांच्या शुभ हस्ते महोत्सवाचे उदघाटन झाले. तदसमयी नॅशनल अवॉर्ड विजेते चित्रपट दिग्दर्शक रमेश मोरे, शॉर्ट फिल्म चे परिक्षक पद्माकर गांधी, लेखक महेंद्र पाटील उपस्थित होते. यावेळी शॉर्ट फिल्मचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. खजिनदार सर्वेश सांडवे, स्पर्धा प्रमुख सुधीर सोमवंशी, व्यवस्थापक विकास मोजर, कार्यकर्ते गणेश तळेकर, लव क्षीरसागर, पराग सारंग, प्रतीक बोले, आदर्श सातपुते सागर पतंगे यांनी विशेष आयोजन करून महोत्सव पार पाडला महोत्सवाचे




सूत्रसंचालन तेजस्विनी मुंडये यांनी केले. विविध चित्रपटांच्या स्क्रीनिंगला अभिनेते गौरव मोरे, दिग्दर्शक समित कक्कड़, दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर, लेखक संजय नवघिरे, दिग्दर्शक निर्माते अजय भालेराव, तिरूपति बालाजी देवस्थानचे पुजारी उपस्तिथ होते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष-संस्थापक चंद्रशेखर सांडवे यांनी सर्वांचे आभार मानले.

मुंबई प्रतिनिधी : रमाकांत मुंडे

# कायदे तज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजात अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या कार्याने आणि विचारांनी भारतीय लोकतंत्राच्या मूलभूत तत्त्वांना निरंतर आधार दिला आहे. त्यांच्या योगदानामुळे भारतीय संविधानाच्या निर्मितीत महत्वपूर्ण प्रगती झाली आहे, जी आजच्या काळातही महत्त्वपूर्ण ठरते. त्यांच्या विचारप्रवृत्ती, दृष्टिकोन आणि त्यांनी केलेली कार्ये आजही या समाजाला प्रेरणा देणारी आणि मार्गदर्शक आहेत.

१. कायदे पंडित:

डॉ. आंबेडकर हे एक अत्यंत प्रसिद्ध कायदे पंडित होते, ज्यांनी प्रत्येक गोष्टीच्या आढावा घेतला आणि कायद्यातील शिक्षण तर अमेरिकेतून घेतले. त्यांच्या शिक्षणाचा उपयोग करून, त्यांनी भारतीय कायदेतंत्राच्या मजबूतीसाठी विविध महत्त्वाच्या कामांचे आयोजन केले. त्यांची कायद्याबाबतची गहरी समज आणि त्यांचे सजग विचार यामुळे नवीन कायदे आणि सुधारणा शक्य झाल्या.२. भारतीय घटनेचे शिल्पकार:


डॉ. आंबेडकर यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार मानले जाते. संविधानाच्या मसुद्यात त्यांनी केलेले महत्त्वाचे बदल आणि सुधारणा देशाच्या संविधानिक व्यवस्थेच्या आधाराशी संबंधित आहेत. त्यांनी सामाजिक असमानतेच्या समस्यांना समजून घेत, त्या विरोधात ठोस उपाययोजना सुचविल्या ज्यामुळे भारतीय समाजात एक नवा विचारशुद्ध बिंदू तयार झाला.

३. संविधानातील मूलतत्त्वे:

समता: डॉक्टर आंबेडकरांनी सर्व नागरिकांच्या समान हक्कांचे संरक्षण सुनिश्चित केले. संविधानाने जाती, धर्म आणि लिंगाच्या भेदाभेदावर प्रतिबंध लावला. त्यामुळे समाजात समतेची भावना वाढीस लागली.

स्वातंत्र्य : प्रत्येक नागरिकाला व्यक्तिस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यात आले आहे. या स्वातंत्र्यामुळे नागरिकांच्या अधिकारांचे उल्लंघन कमी झाले.

न्याय : सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय या तत्वांचा समावेश करून, संविधानाने सर्व



नागरिकांना न्यायाचा हक्क प्रदान केला. यातून न्यायाच्या खोटी बाजू लपवण्यास प्रतिबंध करण्यात आला.

बंधुता : विविधता आणि एकात्मतेसह सहिष्णुता वाढवण्यासाठी बंधुत्वाच्या तत्वांचे पालन केले आहे. या मूल्यामुळे समाजात एकता निर्माण झाली आहे.

४. भारत एक संघ:

डॉ. आंबेडकरांनी भारतीय संघराज्याच्या स्वरूपावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी विविधतेत एकता साधण्यासाठी आणि सर्व घटकांना समान हक्क द्यावा म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या दृष्टिकोनामुळे भारतीय संघराज्य यशस्वीपणे एकत्रित बनले आहे आणि त्याच्यातील विविध व विकासशील घटकांना समानाधिकाऱ्याच्या रूपात कार्य करण्याची संधी मिळाली आहे.

५. लोकशाहीचा आत्मा:

भारतीय संविधानाला लोकशाहीचा आत्मा मानले जाते. संविधानाच्या माध्यमातून, प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार, अभिव्यक्तीची स्वातंत्र्य, आणि सामाजिक न्याय मिळतो. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही प्रक्रियेतील सर्व स्तरांवर जनतेचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी अनेक उपक्रम राबवले, ज्यामुळे जनतेचे मुद्दे आणि त्यांची आजची स्थिती लक्षात घेतली गेली.

६. बाबासाहेब आंबेडकरांचे मूल्य:

डॉ. आंबेडकरांचे कार्य आणि तत्त्वज्ञान आजही प्रेरणादायक आहे. त्यांच्या विचारांचे अनुसरण करून, आपण एक समता आणि न्यायपूर्ण समाज निर्मिती करू शकतो. त्यांचा संघर्ष आणि कृती समतेची भावना, धार्मिक सहिष्णुता, आणि भारतातील विविधता स्वीकारण्यास आमच्या मनात साक्षर करणारी आहे. डॉक्टर आंबेडकरांच्या शिक्षणांनी, विचारांनी, आणि कृतींनी भारतीय समाजाला मजबूत एकता प्राप्त झाली आहे, आणि ते त्यांच्या कार्याच्या उत्तम परिणामस्वरूप यांनी साधलेले मूल्य आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान भारतीय संविधानाच्या निर्मितीत अत्यंत महत्त्वाचे असल्याने, ते आजच्या भारताच्या लोकशाहीला स्थिर ठेवण्यासाठी अपरिहार्य ठरते. आजच्या विसंगतींमध्ये गती साधण्यासाठी, त्यांच्या विचारांची आणि कार्याची पूर्तता करण्याची आवश्यकता आहे.

बालाजी जगतकर
संपर्क - ९९६०१७४५९७
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष लेखमाल क्र. ३

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समितीच्या शिबीरात ६१ जणांचे उत्स्फूर्त रक्तदान

## विविध उपक्रम राबविणार - महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ

प्रतिनिधी @ अंबाजोगाई



शहरातील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघाच्या वतीने यावर्षी ही क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती विविध उपक्रमांचे आयोजन करून साजरी केली जाणार आहे. जयंतीच्या निमित्ताने गुरूवारी आयोजित शिबिरात ६१ जणांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी येथील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने अंबाजोगाईत आज ११ एप्रिल २०२५ रोजी १९७ वा क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या जयंती उत्सवानिमित्त गुरूवार, दिनांक १० एप्रिल रोजी आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून शांतीनाथ बनसोडे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.दिपक फुटाणे हे उपस्थित होते. शिबिराचे उद्घाटनानंतर ६१ जणांनी उत्स्फूर्त रक्तदान केले. यावेळी शिबिर उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.के.मसने यांनी केले. तर उपस्थितांचे आभार राम घोडके यांनी मानले. महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघाच्या माध्यमातून यावर्षी ही क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती अभिवादन, रक्तदान शिबीर, अभिवादन रॅली, वृक्ष वाटप आणि प्रबोधनपर व्याख्यान आदी विविध उपक्रमांचे आयोजन करून साजरी करण्यात येणार आहे. रक्तदान शिबिर प्रसंगी प्रकाश बलुतकर, विष्णु राऊत, अंकुश घोडके, राम जिरे, संतोष राऊत, अनंत मसने, डॉ.दत्तात्रय मसने, भागवत मसने, गणेश जाधव, करपुडे सर, ज्ञानेश्वर जिरे, बालासाहेब माळी, मधुकर घोडके, बंडू मसने, रमेश जिरे, बलुतकर सर, मिलिंद बाबजे, पंकज राऊत, नितीन जिरे, मंगेश बलुतकर, राहुल माळी, अभय जिरे, निवृत्ती जिरे, संदेश डाके, शरद माळी, भारत घोडके, श्रीकृष्ण घोडके, बळीराम धनवडे, आकाश चोपने, गजानन घोडके, प्रविण चोपने, योगेश कातळे, अक्षय घोडके, बालाजी घोडके, बालाजी जिरे, दिपक आरसुडे, ऋषि मसने, कृष्णा मसने, नवनाथ माळी, अनिकेत घोडके, पवन घोडके, अनुज घोडके, विशाल, महेश, अक्षय चोपने, पवन जिरे, दामोदर माळी, भागवत जिरे, किरण भालेकर, सुधीर माळी, रोहन माळी, बाळु फुलझळके, दत्तात्रय बनसोडे, शाहीर तुकाराम, प्रविण जोगदंड, राहुल जिरे, अतुल राऊत, सतिश राऊत, शिवराज राऊत, संदीपान देशमाने, गोविंद पाथरकर, ऋषि पाथरकर, किरण पाथरकर, नंदकुमार बलुतकर, सुमीत सुनील राऊत, प्रदीप चोपणे, गोविंद पाथरकर, सुजीत बोते, अमोल जिरे, भागवत जिरे, दिनेश घोडके, विजय जिरे, महेश घोडके, सागर साखरे, प्रशांत राजमाने, प्रकाश चोपणे, सुरज राऊत, सुशील शिंदे, दयानंद दगडू राऊत, प्रज्ज्वल राऊत, उद्धव जिरे, उदय घोडके, बाळासाहेब जिरे, सुधीर डोके, गणेश डाके, पप्पू जिरे आदींसह समाज बांधवांची उपस्थिती होती. रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.




# राधाकृष्णनगरी येथे हनुमान जयंती निमित्त सप्ताहाला सुरुवात

प्रतिनिधी @ बीड

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राधाकृष्ण नगरी पांगरी रोड बीड येथे पंचमुखी हनुमान मंदिर येथे राम नवमी व जन्म राम नवमी हनुमान जयंतीनिमित्त सप्ताहाचे नियोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये सकाळी सात ते नऊ या वेळेमध्ये ज्ञानेश्वरी पारायण आहे तसेच सायंकाळी पाच ते सहा वेळेमध्ये हरिपाठ व रात्री साडेसात ते साडेनऊ या वेळेमध्ये कीर्तनाचे नियोजन करण्यात आले आहे.

किर्तनानंतर आलेल्या सर्व भाविक भक्तांना प्रसादाची महापंगत होत आहे. या पणतीसाठी राधाकृष्णनगरी व रेणुका नगरी तसेच सर्व भाविक भक्तांचे मोलाचे सहकार्य लाभलेले आहे या सप्ताहामध्ये दिनांक १० ४ २०२५ वार गुरुवार या दिवशी बाबुराव महाराज मुंडे यांचे रात्री साडेसात ते साडेनऊ या वेळेमध्ये कीर्तन होईल तसेच दिनांक ११ ४ २०२५ वार शुक्रवार रोजी रात्री साडेसात ते साडेनऊ या वेळेमध्ये शिवचरित्रकार प्रतिभाताई पाटील गायकवाड केतूरेकर यांचे कीर्तन होईल तसेच १२ ४ २०२५ यांचे अमृततुल्य कीर्तन होईल हरिभक्त परायण सुरेशानंद जी महाराज कोळेकर श्री क्षेत्र संस्थान सुंदरशी गड यांचे कीर्तन अमृततुल्य असे आहे शनिवारी सकाळी साडेअकरा ते दीड या वेळेमध्ये काल्याचे किर्तन होईल त्यानंतर लगेच महापत्त्याची पंगत होईल तरी या महाप्रसादाचा सर्वांनी लाभ घ्यावा अशी विनंती राधाकृष्णनगरी रेणुका नगरी तसेच सप्ताह कमिटी आयोजक यांची आग्रहाची विनंती आहे. या सप्ताहामध्ये ज्या भाविक भक्तांना देणगी स्वरूपाची मदत करायची आहे. त्यासाठी सप्ताहाच्या धर्म मंडपामध्ये देणगी काउंटर चालू आहे तसेच ऑनलाईन सुविधाही उपलब्ध आहे. तसेच या सप्ताहामध्ये ऑनलाईन चित्रीकरण होत आहे. युट्युब वरती ही छायाचित्रण होत आहे.




बीड शहरामध्ये आज आमचे मार्गदर्शक आदरणीय प्रा. ड. जयमंगल धनराज सर ( मुंबई हायकोर्ट) आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व बीड येथे आले असता ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्हाच्या वतीने शाल, व संविधानाची उद्धेशीका देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नितीन सोनवणे महाराष्ट्र प्रवक्ता- तथा जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड, तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक प्रा. प्रदिप जी रोडे सर, सुर्यकांत ठोकळ, अनिल शेलार, सुरज वाघमारे, रोहीत सोनवणे उपस्थित होते..!

# श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालयात नवागतांचे स्वागत व रॅलीचे आयोजन करून प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

प्रतिनिधी @ अंबाजोगाई




श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय (केंद्र विभाग) अंबाजोगाई येथे नवीन(छएझ २०२०)राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिली मध्ये प्रवेश पात्र नवागतांचे स्वागत व रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यालयात पहिले पाऊल ठेवलेल्या चिमुकल्यांना शाळेची गोडी लागावी तसेच हा दिवस चिरकाल त्यांच्या स्मरणात रहावा हा या कार्यक्रमा मागील उद्देश होता. नवागतांचे औक्षण करून त्यांना स्मायली चेंडू, पेन्सिल,पुष्प, फुगा, देऊन त्यांचे स्वागत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच नवागतांच्या बोटाला धरून रांगोळी मध्ये ओम गिरवून घेण्यात आले. नवागता समवेत माता पालक व पुरुष पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. विद्यालयात सुंदर असे सुशोभन केले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष शालेय समितीचे अध्यक्ष मा. श्री.उन्मेष दादा मातेकरसर, प्रमुख पाहुणे श्री महादेव कावळेसर ( संचालक,श्रीराम वस्तीगृह, अंबाजोगाई ), श्री मुंजाजी नेमाने सर, माता पालक सौ.अश्विनी माने, विशेष उपस्थिती शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री.शिवाजीराव हेंडगेसर, विभाग प्रमुख श्री. श्रीधर चौरे सर, कार्यक्रम प्रमुख मंदाकिनी खडके इ. मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंदाकिनी खडके यांनी केले यामध्ये त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. श्री नेमाने सर यांनी शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांची आपुलकीने काळजी घेतात असे सांगितले. श्री. शिवाजीराव हेंडगे सर यांनी आपल्या संस्कारकेंद्रातील विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व वैशिष्ट्ये सांगत अभ्यासक्रमाबरोबरच छोट्या गोष्टीतून संस्काराची रुजवणूक येथे करत असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात श्री मातेकर दादा यांनी विविध अडचणीचा सामना करत आपण शिक्षण घेऊन राष्ट्राच्या उत्थानासाठी,विकासासाठी सदैव तत्पर राहिले पाहिजे असे सांगत , छोट्या -छोट्या गोष्टीतून देण्याचा संस्कार रुजावा ही संत रामदास स्वामी यांची प्रेरक कथा सांगितली. वैयक्तिक पद्य गायत्री संदिकर यांनी म्हटले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कीर्ती तुपकर यांनी तर आभार सोनवणे सुनिता यांनी मानले. शेवटी पालकांनी आपल्या पाल्यासमवेत सेल्फी काढला यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# तुम्ही चालत राहा..पाठींबा मिळेलच...या भावनेतुन राजकारण सुरूच ठेवणार - माजी आ.भीमराव धोंडे

प्रतिनिधी @ आष्टी



आपण महेश सहकारी साखर कारखाना सुरु करणर आहोत. काही लोक कारखाना कसा सुरु होणार नाही यासाठी अडचणी आणत आहेत, परंतु त्यांच्या या कुटील डावाला भिक न घालता आपण आपल्या पध्दतीने कारखाना सुरु करणारच आहोत. तांत्रिक मुद्दे मांडत अडचणी आणण्याचा प्रयत्न कोण करतय ? हेही सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना माहित आहे. महेश सह. साखर कारखान्याचे पाच तालुक्याचे कार्यक्षेत्र आहे. भाजप तालुकाध्यक्ष ड. साहेबराव म्हस्के, अजय धोंडे व माझे भाजपने निलंबन केलेले आहे. ते निलंबन रद्द करावे यासाठी आम्ही पक्षश्रेष्ठीकडे पत्र देऊन मागणी कलेली आहे. आमचे निलंबन रद्द होणारच आहे. सामाजिक व राजकीय कार्य सुरुच ठेवणार आहे. तुम्ही चालत राहा..पाठींबा मिळेलच... या भावनेतुन राजकारण सुरूच ठेवणार असल्याचे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगीतले.

यावेळी माजी आ. भीमराव धोंडे, भाजपचे तालुकाध्यक्ष ड. साहेबराव म्हस्के, नियामत बेग, डा. अजय धोंडे, चेअरमन राजेंद्र धोंडे, अशोक साळवे, बबन औटे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, लालाभाऊ कुमकर, ड. रत्नदीप निकाळजे, संभाजी जगताप, बाबासाहेब आंधळे, रावसाहेब लोखंडे, हरिभाऊ जंजीरे, दादा जगताप, मोहन खेडकर, सदा पाटील दिंडे, उत्तम बोडखे, अरुण सायकड, अस्ताक शेख, शाम सांगळे, बजरंग कर्डीले, विनोद ढोबळे, रोहिदास कर्डीले, गौतम सावंत, सरपंच अभय गर्जे, बाळासाहेब वाघुले, आण्णासाहेब लांबडे, लिंबराज कर्डीले, नानाभाऊ वाडेकर, ड. नवनाथ विधाते, गौतम ससाणे, सोपान गाडे, नंदु फसले, विठ्ठल लांडगे, बाळासाहेब शेकडे, नानाभाऊ वाडेकर, परमेश्वर खेडकर, युवराज खटके आबा तावरे, बबन सांगळे, मोहन झगडे, हादी शेख, अतुल मुळे, सोनाजी गांजुरे, कुंडलीक आस्वर, बाबा ससाणे, शेख अज्जुभाई, बाबासाहेब गायकवाड, बाबासाहेब गर्जे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजप तालुकाध्यक्ष पदासाठी लालाभाऊ कुमकर, संभाजी जगताप, दादासाहेब जगताप, हरिभाऊ जंजिरे, अड. रत्नदीप निकाळजे, अभय गर्जे, गौतम ससाणे, बाळासाहेब शेकडे, रघुनाथ शिंदे, नानाभाऊ वाडेकर, परमेश्वर खेडकर, युवराज खटके यांनी इच्छा व्यक्त केली. या बैठकीचे अध्यक्षस्थानी बबनराव औटे हे होते.

आष्टी विधानसभा मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी भाजप तालुकाध्यक्ष पदासाठी इच्छुक कार्यकर्त्यांची बैठक गुरुवारी दि. १० एप्रिल रोजी झाली. तालुकाध्यक्ष पदाचे इच्छुकांची नावे ना. पंकजाताई मुंडे आणि पक्षाच्या वरीष्ठांकडे सादर करण्यात येणार आहेत. पंकजाताई जे नाव तालुकाध्यक्ष पदासाठी जाहीर करतील ते आपल्याला मान्य असेल असे माजी आ. भीमराव धोंडे यांनी यावेळी सांगितले. निर्भिडपणे रहा, कुणालाही घाबरण्याची गरज नाही? कोण काय करत नसतं, आपण पण इथलेच आहोत. असा कानमंत्र उपस्थित कार्यकर्त्यांना दिला. निवडणुका येत असतात ..जात असतात...आपला पराभव झाला म्हणून हार मानायची नाही. पुन्हा जोमाने कामाला सुरुवात करायची, कुणाला घाबरायच पण नाही. निर्भिडपणे रहायचं. आपण पण इथलेच आहोत. जर कोणी दम दिला तर व्हिडिओ काढायचा सोशल मिडीयावर टाकायचा क्राईम पोलिसच गुन्हा दाखल करतात. कारवाई करतात. नव्या जोमाने पुन्हा कामाला लागा असेही धोंडे यांनी यावेळी सांगितले.



# गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरेंच्या आवाहनाला शिक्षकांचा उदंड प्रतिसाद

## पुस्तकांमूळे गटसाधन केंद्राला आले वाचनालयाचे स्वरुप

वडवणी (प्रतिनिधी):- वडवणी तालुक्याचे कार्यतत्पर व कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त अभिनव सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प करत आपल्या वाढदिवसानिमित्त हारतुरे न करता त्यातूनच भेट म्हणून पुस्तके देण्याचे आवाहन करण्यात आले होते. या अनूषंगाने वडवणी तालुक्यातील ७ केंद्रातील सर्व शिक्षक बांधवांच्या वतीने साहेबांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त प्रत्येकी केंद्रातून ५४ पुस्तके याप्रमाणे जवळपास ४०० विविध ग्रंथ, कादंबरी व पुस्तके ही त्यांना भेट म्हणून देण्यात आली. दरम्यान ही सर्व पुस्तक व ग्रंथसंपदा गटसाधन केंद्रातच संग्रहीत करुन सर्वांना वाचनासाठी ठेवणार असल्याची प्रतिक्रिया गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी याप्रसंगी व्यक्त केली. दरम्यान या सर्व पुस्तकांमुळे गटसाधन केंद्राला एकप्रकारे वाचनालयाचे स्वरुप प्राप्त झाले होते. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, आपल्या उत्कृष्ट कार्यशैलीतून संपूर्ण बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी छाप पाडलेले व कोणत्याही शैक्षणिक उपक्रमात वडवणी तालुका अग्रक्रमी ठेवणारे तालुक्याचे कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांचा वाढदिवस दिनांक ६ एप्रिल २०२५ रविवार रोजी मोठ्या उत्साहात व अभिनव सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात आला. आपल्या या वाढदिवसानिमित्त कोणीही हारतुरे व इतर अनावश्यक बाबींवर पैसे खर्च न करता याच पैशांचा सदुपयोग व्हावा या उद्देशाने व वाचन जागृती व चळवळीला प्रेरणा मिळावी या हेतूने सर्वांनी ग्रंथ, कादंबरी व पुस्तके याचे आपण वाटप करावे असे आवाहन त्यांनी केले होते. त्यांच्या याच आवाहनाला वडवणी तालुक्यातील सर्व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक बंधू भगिनी यांनी उदंड प्रतिसाद देत उजगरे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना ग्रंथ, कादंबरी व पुस्तकांची भेट दिली. दरम्यान वडवणी तालुक्यात एकूण ७ केंद्र असून या सातही केंद्रातील सर्व शिक्षक बांधवांच्या वतीने बाबासाहेब उजगरे यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त प्रत्येकी ५४ पुस्तके अशा प्रकारे एकूण ३७८ पुस्तके तसेच इतर मान्यवरांनी जवळपास २५ पुस्तके अशी जवळपास ४०० पुस्तके त्यांना भेट म्हणून प्राप्त झाली आहेत. दरम्यान वाचनातूनच माणसाचा सर्वांगिण विकास साध्य होतो. वाचाल तर वाचाल याप्रमाणे वाचनाशिवाय गत्यंतर नाही. आपली बौध्दिक प्रगल्भता अधिक प्रगल्भ करण्यासाठी प्रत्येकाने वाचन हे करायलाच पाहिजे. हीच वाचन जागृती व चळवळ वाढीस लागावी या उद्देशानेच हा संकल्प आपण केला होता. याला आपण सर्वांनी भरभरुन असा प्रतिसाद दिला याबध्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो. तसेच ही सर्व पुस्तक व ग्रंथसंपदा गटसाधन केंद्रातच संग्रहीत करुन सर्वांना वाचनासाठी ठेवणार असल्याची प्रतिक्रिया गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी याप्रसंगी व्यक्त केली. दरम्यान रविवारी सुट्टी असतांनाही आपल्या लाडक्या साहेबांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासाठी दिवसभर शिक्षक वृंद तसेच शिक्षण क्षेत्राशी निगडित सर्व मान्यवर व इतर हितचिंतक, मित्रपरिवार यांनी मोठी गर्दी केली होती. या सर्व पुस्तकांमुळे गटसाधन केंद्राला एकप्रकारे वाचनालयाचे स्वरुप प्राप्त झाले होते.

# सोनीमोह्यात जगंदबा देवी यात्रेत पालखी मिरवणुकीसह रेवड्यांची उधळण

प्रतिनिधी ।धारूर

मंदिराचा लोकसहभागातून जीर्णोद्धार झाल्यानंतर जगदंबा देवीची यात्रा शनिवारी (१२ एप्रिल) होत आहे. पालखी मिरवणूक, अंबिल घुगऱ्याच्या वाटपाबरोबर रेवड्यांची उधळण या यात्रेत होते. यंदा ग्रामस्थांनी उत्सवाचे जय्यत नियोजन केले आहे.भाविक नवस मोठ्या संख्येने उपस्थित राहतात .

धारूर तालुक्यात आठ किमी अंतरावर उत्तरेस सोनीमोहा येथील बालाघाटाच्या डोंगरावर जगदंबा देवीचे मंदिर आहे. हे मंदिर पुरातन असून नवसाला पावणारी देवी म्हणून सर्वत्र ख्याती आहे. नवरात्र उत्सवानंतर कोजागरी पौर्णिमा व चैत्र पौर्णिमा अशी दोन वेळा जगदंबा देवीची यात्रा भरते. उन्हाळ्याच्या दिवसांत भरणारी यात्रा ही वैशिष्ट्यपूर्ण असते. गावापासून दीड किमी अंतरावर डोंगरावर असलेल्या मंदिरापर्यंत पालखी मिरवणूक काढण्यात येते.

पालखीसोबत गावात ग्रामस्थ आंब्यापासून बनवलेली अंबिल ही माठात भरून पालखीबरोबर सोबत घेतात. याचबरोबर गहू, हरभऱ्याच्या घुगऱ्या प्रसाद म्हणून वाटण्यासाठी घेतात. मंदिरात पालखी गेल्यानंतर या ठिकाणी खारीक, रेवड्यांची मोठ्या प्रमाणात शिखरावर तसेच पालखीवर उधळण होते.

या वेळी हजारो भाविक या ठिकाणी उपस्थित असतात. यासह साखर, गूळ याची शेरणी म्हणूनही भाविक वाटप करतात.जगदंबादेवीचे मंदिर हे बालाघाटाच्या पहाडावर असून या ठिकाणी पुरातन असे वडाची झाडे आहेत. पुरेशी सावली असल्यामुळे यात्रेच्या दिवशी भाविक दिवसभर येथे थांबतात. पालखी येईपर्यंत या ठिकाणी भाविक थांबलेले असतात. यात्रेनिमित्त मिठाई, खेळणी याचबरोबर विविध प्रकारची या ठिकाणी विक्रीसाठी दुकाने येतात. बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातून भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येतात.

त्याचबरोबर चोंडी, आंबेवडगाव, गावंदरा, धुनकवाड, थेटेगव्हाण, पाडीपारगाव, चोरांबा, अरणवाडी, भायजळी, धारूर, भोगलवाडी, चारदरी , पिंपरवाडा या पंचक्रोशीतील भाविकांची येथे मोठ्या प्रमाणात गर्दी होते.

एक किमी पालखी मिरवणूक

सोनीमोहा गावाच्या पूर्वेस एक किमी अंतरावर डोंगर पहाडावर जगदंबा देवी मंदिर आहे. गावापासून मंदिरापर्यंत पालखी मिरवणूक काढण्यात येते. तीन ते चार तास मिरवणूक कार्यक्रम राहतो. पालखीसोबत ग्रामस्थ , भावीक सहभागी होतात .

- दत्ता गिरी , देवी पुजारी



# शिवछत्र परिवाराने आणले गोदावरी नदी पात्रात पाणी

## शेतकरी व नागरिकांनी अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे मानले आभार

प्रतिनिधी @ गेवराई



गोदापट्टयातील शेतकरी व नागरिकांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी शासन दरबारी सातत्याने प्रयत्न केल्यामुळे गोदावरी नदी पात्रात नाथसागरातून पाणी सोडण्यात आले आहे. उन्हाळ्यात गोदावरी पात्र पाण्याने भरले असून जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर, मदन भुसारे यांच्यासह गोदापट्यातील सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिकांनी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, गोदाकाठच्या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली होती. गोदावरी नदी कोरडी पडली होती. जनावरांसह नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या कडे गोदाकाठच्या शेतकऱ्यांनी आपला प्रश्न मांडला होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गंभीर दखल घेऊन अमरसिंह पंडित यांनी शासन दरबारी प्रयत्न करुन हा प्रश्न चुटकीसरशी सोडवला आहे. जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून गुळज येथील सी.आर. ३ व तळणेवाडी येथील सी.आर. ४ मधुन गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे गेवराई व अंबड तालुक्यातील गोदाकाठच्या दोन्ही बाजुच्या शेतकरी व नागरीकांना या पाण्याचा फायदा झाला असून

सर्व शेतकरी व नागरीकांनी आनंद व्यक्त केला आहे. गोदापटट्यातील नागझरी ख खामगाव, सावळेश्वर, राक्षसभुवन सुरळेगाव व ईतर सर्व शेतकऱ्यांच्या वतीने अमरसिंह पंडित साहेब व आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी नदी पात्रात पाणी आणल्या बद्दल शेतकऱ्यांनी आनंद साजरा केला.

# मयुरी क्षीरसागर विशेष प्राविण्यासह एमबीबीएस परीक्षेत उत्तीर्ण



प्रतिनिधी @ बीड

येथील बीड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे शिक्षण विस्तार अधिकारी गंगाधर क्षीरसागर यांची कन्या डॉ.मयुरी गंगाधर क्षीरसागर विशेष प्राविण्यासह एमबीबीएस परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. सर्व स्तरातून डॉक्टर मयुरी हिचे अभिनंदन करण्यात येत आहे.डॉ. मयुरी क्षीरसागर हिने प्रतिकूल परिस्थिती शिक्षण घेतले आहे. लहानपणापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या मयुरी हिचे शालेय शिक्षण बीड तालुक्यातील यळंबघाट येथे तर वैद्यकीय पदवी 'एमबीबीएस'चे शिक्षण बी.जे. मेडिकल कॉलेज, ससुन पुणे, येथे झाले आहे. विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाल्यामुळे मयुरीचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकवंद, नातेवाईक, मित्रपरिवार आणि स्नेहांकितांनी अभिनंदन करून पुढील उच्च शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# दत्त संस्थान बालाघाट येथे चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरी होणार



प्रतिनिधी @ बीड

येथे जवळ असलेले श्री दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ रोजी प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने, दत्त उपासक श्री.वैजनाथ महाराज शिंदे यांच्या अधिपत्याखाली चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा होणार आहे. या जन्मोत्सव सोहळ्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच मासिक पौर्णिमेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेली आहे.

पंचक्रोशीतील भाविक भक्तांना नम्र विनंती आहे की या चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सवला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) व महादेव अण्णा शेलार रा.शिवाजीनगर (उदंडवडगाव) यांनी केले आहे.

# श्रीक्षेत्र नारायण गडाचा ७३ वा नारळी सप्ताह प्रारंभ !

## नारायण नारायण नगद नारायण भजनाने राक्षसभुवन भक्तिसुखात न्हाऊन निघाले !

प्रतिनिधी @ मानुर

शिरूर कासार तालुक्यातील राक्षसभुवन येथे श्रीक्षेत्र नारायण गडाचा ७३ वा नारळी सप्ताह महंत शिवाजी महाराज यांचे अध्यक्षतेखाली प्रारंभ झाला .भक्तगण नारायण नारायण नगद नारायण या भजनाने भक्तिसागरात न्हाऊन निघाले होते. नारायण गडावरून महंत शिवाजी महाराज व संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे हेलिकॉप्टर ने सप्ताह स्थळी आगमन झाले .शिस्तबध्द आणि परंपरेच्या चौकटीत नारळी सप्ताहाला पहिल्याच दिवशी रेकॉर्ड ब्रेक गर्दि दिसून आली . हेलिपॅड पासुन टाळ मृदंग बॅण्ड असी सवाद्य मिरवणूक शोभायात्रेने राक्षसभुवनला आनंदाचे उधान आले होते .देवघरात




यथाविधी स्थापना झालेनंतर मुख्य कीर्तन व्यासपिठावर शिवाजी महाराज व मनोज जरांगे पाटील यांचे आगमन झाले ,गडाचे उत्तराधिकारी संभाजी महाराज यांचे हस्ते टाळ विणा मृदंग व ग्रंथ पुजन करण्यात आले .यावेळी श्रीराम संथानचे महंत भानुदास शास्त्री ,ज्ञानेश्वर आश्रम चे महंत नारायण महाराज डीसले आदी संत महंताची उपस्थिती होती ,वे शा सं बाळूदेवा मुळे यांनी सांगोपांग पुजाविधी केला आणि पुंडलीक वरदा असा जयघोष करून फुलांचा वर्षाव केला .

आयोजक राक्षसभुवन ग्रामस्थ सेवेसाठी तत्पर असुन येणाऱ्या भाविकांची सेवा करणार आहेत .ज्ञानदाना बरोबर अन्नदानालाही महत्व दिले जाणार असुन नगद नारायण महारांजाची सेवा समजून ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

### नारायण गडाचे विश्वस्थ उपस्थित!

नारायण गडाचे विश्वस्थ आवर्जून उपस्थित होते तसेच जेष्ट राजकीय सुशिलाताई मोराळे ,आदिनाथ गवळी उपस्थित होते त्यांचा व उपस्थित मान्यवरांचा ग्रामस्थाच्या वतीने सत्कार करण्यात आला .

# संविधान निटपणे समजून घ्यायला हवे - ॲड.जयमंगल धनराज

प्रतिनिधी @ बीड

देशातल्या प्रत्येक, व्यक्तीने भारतीय संविधान निटपणे समजून घेवून, ते वाचायला हवे. कारण देशात संविधान लागू झाल्यानंतर आमूलाग्र बदल झालेत. शोषित, पीडित, तसेच प्रत्येक समूहाला त्यांचे हक्क आणि अधिकार मिळाले.म्हणून त्यातील कायद्याच्या तरतुदी आणि कायद्या मागचे तत्वज्ञान समजून घ्यायला हवे.तरच आपल्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकर समजून येतील. असे विचार ड.जयमंगल धनराज यांनी व्यक्त केले.



बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे, ४ ते १४ एप्रिल या कालावधित जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने बुधवार (दि.९) रोजी आयोजित केलेल्या व्यख्यानमालेत ड.जयमंगल धनराज बोलत होते.या कार्यक्रमाल अध्यक्ष म्हणून पोलीस अधीक्षक नवनित कावत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ड.राजु शिंदे, प्रा.उत्तम साळवे, सुरेश साबळे आदी उपस्थित होते.

उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करतांना ड.जयमंगल धनराज म्हणाले की, आज भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होताहेत. त्यामुळे प्रत्येक भारतीयासाठी ही बाब गौरवास्पद आहे. ड.जयमंगल धनराज असंही म्हणाले की, देशात आज अनेक आव्हाने आहेत.त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. ध्येय आणि धोरणे यावर कायदे करण्यासाठी संविधानात, निर्देश आहेत.मात्र तशी प्रक्रिया आज राज्यकर्त्यांकडून होताना दिसून येत नाही. देशातील जनतेने आता सुज्ञ होणे गरजेचे आहे. असे परखड मत ड.जयमंगल धनराज यांनी व्यक्त केले.अध्यक्षीय मनोगतात, पोलीस अधीक्षक नवनित म्हणाले की,भारतीय संविधान जगात श्रेष्ठ आहे.कारण विविध जाती-धर्म, भाषा-प्रांत, वेश-भूषा असलेले नागरिक एकसंघ रहातात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने संविधान वाचावे.असे मत पोलीस अधीक्षक नवनित म्हणाले.

या व्याख्यान मालेचे प्रस्ताविक प्रा.प्रदिप रोडे यांनी केले. सूत्रसंचालन ड.नितीन वाघमारे तर आभार ड.राजेश शिंदे यांनी मानले.दरम्यान जयभिम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

असे होणार कार्यक्रम

तुलसी संगणक महाविद्यालयात आज शुक्रवार (दि.११) एप्रिल रोजी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत१८ तास अभ्यास, सकाळी ८ ते १० क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अभिवादन, सकाळी १० ते ५ आरोग्य शिबीर, सायंकाळी ६ वाजता डॉ.प्रकाश सिरसट यांचे व्यख्यान होणार आहे.

# महापुरुष स्पर्धेचे पारितोषिक वितरण

## जयभिम महोत्सव:विद्यार्थ्यांनी नोंदवला उत्स्फुर्त सहभाग

प्रतिनिधी @ बीड




राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये ४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून गुरुवार (दि.३) एप्रिल रोजी महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा तालुका पातळीवर घेण्यात आली होती. त्या परीक्षेला एकूण एक हजार विद्यार्थी बसले होते, त्यामध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा बीड शहरातील तुलसी महाविद्यालय येथे रविवार (दि.६) एप्रिल रोजी पार पडली त्यामध्ये शेकडो विद्यार्थी परीक्षेस होते.

स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महापुरुष सामान्य ज्ञान समितीचे प्रमुख प्रा. अशोक गायकवाड,भारत मगर,प्राचार्य प्रदीप गाडे,सुमेध जोगदंड, ड.राजेश शिंदे, महादेव इनकर यांनी सुयोग्य नियोजन केले होते.

अंतिम परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रथम शोएब शौकत आतार, प्रिती उगले, शिवानी गाडेकर, उत्तेजनार्थ तुमी उपरे, पृथ्वीराज उगले, संघवी जोगदंड, अन्वी जोगदंड यांना वितरित करण्यात आले.




# कीर्तन, प्रवचनामुळे समाज संस्कारक्षम व निरोगी राहण्यास मदत होते- ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे

बीड प्रतिनिधी

संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांकडे लक्ष दिले पाहिजे. किर्तन, प्रवचन आणि धार्मिक कार्यक्रमामुळे लहान मुलांवर संस्कार होतात. त्यामुळे पालकांनी धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून संस्कारक्षम तरुण पिढी घडविण्यासाठी व समाजमन निरोगी राहण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे आवाहन ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांनी केले. बीड शहरातील पांगरी रोड भागात राधाकृष्ण नगरी येथे आयोजीत हनुमान जन्मोत्सव अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे बोलत होते. 'ऐसी जोडी करा राम कंठी धरा। तेणे चुके फेरा गर्भवास।।१।। नाशिवंत आटी प्रिया पुत्र धन।बीज ज्याचे क्षीण तेची फळ।।२।। जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर बोलतांना ह.भ.प.खरमाटे महाराज यांनी सुश्राव्य कीर्तन केले.

याप्रसंगी बोलताना खरमाटे महाराज म्हणाले, जीवनामध्ये पुढे जायचे असेल, जीवन यशस्वी व्हायचे असेल तर कष्ट घ्यावे लागतात. त्याचप्रमाणे परमेश्वरांच्या प्राप्तीसाठी अखंड नामस्मरण करावे लागते. बंकट स्वामी, नगदनारायण महाराज, भगवानबाबा, वामनभाऊ यांच्या नंतर आपण जन्माला आलो. आपण भग्यवान आहोत. संतांचे संस्कार आणि शिकवणुकीमुळे नामचिंतन आणि परमार्थासाठी जीवन व्यथीत करु शकतो. देवत्वाकडे पोहचविण्यासाठी कर्म, भक्ती आणि ज्ञानाचा उपयोग होतो, असे सांगून कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून परमेश्वर प्राप्तीचा मार्ग सापडतो, असे खरमाटे महाराज म्हणाले.

यावेळी मृद्रंगाचार्य ह.भ.प. चंद्रकांत महाराज शेळके, गायनाचार्य ह.भ.प.बाबुराव महाराज मुंडे, गणेश म.पिंपळे, मनोज म. बोठे, दत्तात्रय म.बहीर, यांच्यासह गणेश खाडे, आप्पासाहेब येवले, महेंद्र ढगे, मधुकर बाल्टे, दिपक बिल्पे, मुकेश शेवगण, सचिदानंद देशमुख, नरेश कुलकर्णी, रविंद्र बजगुडे, उमाकांत भोंडवे, सागर गणगे, राधाकृष्ण पुरी, प्रदिप राठोड, सुधाकर सानप, रामहरी घुले, महादेव घोळवे, नागरे नाना, धनराज शिंदे, आदिंसह भाविक भक्त मोठया संख्येने उपस्थित होते.

# श्री क्षेत्र भगवान गडाच्या नारळी सप्ताहाला पिंपळनेर येथे प्रारंभ

## न्यायचार्य महंत डॉ.नामदेव शास्त्रींचे बाईक रॅलीने आगमन-पुरणपोळी आणि लाडूची पंगत

प्रतिनिधी @ मानुर

श्री क्षेत्र भगवान गडाच्या ९१ व्या नारळी सप्ताहाला तालुक्यातील पिंपळनेर येथे सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी उपस्थित भाविकांना पुरणपोळी आणि लाडूची पंगत देण्यात आली होती.सकाळी पिंपळनेर येथून जवळपास पाचशे दुचाकी आणि शंभरपेक्षा जास्त चारचाकी वाहने श्री क्षेत्र भगवान गडावर महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री यांना घेऊन येण्यासाठी गेली होती.या वेळी भगवान बाबा की जयच्या जयघोषात सदरील रॅली खरवंडी,शिरूर कासार मार्गे पिंपळनेर येथे पोहचली.दुपारी एक वाजता महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री यांच्यासह उपस्थित भाविकांच्या साक्षीने वीणापूजन करण्यात आले.त्यानंतर पुंडलिक वरदे हरी



विठ्ठलाच्या जयघोषात पुष्पवृष्टी करण्यात आली.या वेळी श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्यासह श्री क्षेत्र भगवान गडाचे उत्तराधिकारी कृष्णा महाराज शास्त्री,श्री क्षेत्र इंदुवासिनी संस्थानचे महंत त्रिविक्रमानंद शास्त्री केशवराज संस्थानचे महंत बाबासाहेब महाराज बडे,दत्त संस्थानचे महंत प्रल्हाद महाराज,हरिश्चंद्र पिंपरीचे भगवान महाराज राजपूत,राधाताई सानप,हनुमंत शास्त्री, डॉ.गणेश महाराज शास्त्री,संत भगवान संस्थान तागडगावचे महंत अतुल महाराज शास्त्री,संतोष महाराज गित्ते,रामगिरी महाराज, महेंद्र महाराज मळेकर,काशीनाथ महाराज,नवनाथ महाराज शास्त्री यांची उपस्थिती होती.

### पिंपळनेरकरांचे नियोजन आठच दिवसात ६५ लाख जमा

श्री क्षेत्र भगवान गडाच्या नारळी सप्ताहासाठी केवळ पंधरा दिवसांचा कालावधी मिळालेल्या पिंपळनेर ग्रामस्थांनी चोख नियोजन केले आहे.अवघ्या आठ दिवसांत जवळपास ६५ लक्ष रुपयांची वर्गणी जमा झाली असून येत्या आठ दिवसांत सदरील वर्गणी एक कोटीच्या वर जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### पहिल्याच दिवशी पुरणपोळी आणि लाडूची पंगत

श्री क्षेत्र भगवान गडाच्या नारळी सप्ताहात आठ दिवस वेगवेगळ्या पक्कान्नाची मेजवानी असते.पहिल्याच दिवशी पुरणपोळी आणि घाटशीळ पारगावकरांनी दिलेल्या लाडूचा प्रसाद भाविकांना पंगतीला मिळाला.उर्वरीत आठ दिवसात प्रत्येक दिवशी वेगवेगळा गोड पदार्थ करण्यात येणार असल्याचे देखील आयोजकांनी सांगितले.



चि. शंभु सोमेश सम्राट
यांस २ ऱ्या जन्मदिनाच्या मनापासून शुभेच्छा...!
:: शुभेच्छुक::
चि कवी समाधान हनुमान सम्राट,
राज्यस्तरीय काव्यलेखन प्रथम पुरस्कार विजेते २०२३
सम्राट परिवार छत्रपती संभाजीनगर आणि
ठाकर आडगांव